# कोविड तिच्या आवाजात

तरुण मुलींच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्यावर केंद्रीत केलेला सहभागी संशोधन अभ्यास.



EMpower

UK Government



**डिस्क्लेमर**: या अहवालाला UK गव्हर्नमेंटच्या फॉरेन, कॉमनवेल्थ आणि डेव्हलपमेंट ऑफिस द्वारे प्रमाणित केले आहे| तथापि, अहवालात व्यक्त केलेली मते UK गव्हर्नमेंटच्या शासकीय पॉलिसीला दर्शवत नाही| या अहवालात नकाशे केवळ प्रतिनिधित्वाचा अर्थ दर्शवण्यासाठी वापरले गेले आहेत| नकाशात रेखांकित केलेले कोणत्याही भौगोलिक सीमांना UK गव्हर्नमेंट मान्यता देत नाही|

# कोविड तिच्या आवाजात

तरुण मुलींच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्यावर केंद्रीत केलेला सहभागी संशोधन अभ्यास.

# श्रेयनिर्देश

हुशार लोकांच्या योगदानाशिवाय कोणतेही जटिल व गुंतागुंतीचे कार्य होत नाही. हा अहवाल आणि त्यास कारणीभूत संशोधन अपवाद नाही - विशेषत: नोव्हेंबर २०२० ते मार्च २०२१ रोजी संकुचित कालावधी दरम्यान झाला.

हा अहवाल १५३ मुलींना समर्पित आहे ज्यांनी आपल्या कथा आणि त्यांचे दृष्टीकोन आमच्याशी आणि लीडर लॅबच्या उल्लेखनीय २५ मुली शोधकर्त्यांना सामायिक केले, ज्यांचे समर्पण, अंतर्दृष्टी, आणि ऊर्जा ही संशोधन रचनेसाठी अंमलबजावणी आणि विश्लेषण यासाठी महत्त्वपूर्ण ठरली: **राणी, प्रिया, खुर्शीदा, अवदा, नेत्रावती, ललिता, श्रेया, शाहजहान, नेहा, आलिया, गीता, प्रीती, अल्विश, अंजुम, रोशनी, राधा, ज्योती, शुभांगी, सोनी, मोनिका, वन्सिता, रिचा, पूजा, शिरीन,** आणि **ज़ोहा.** त्यांचे नेतृत्व, भगिनीभाव आणि त्या मुलींच्या समवयस्कांबद्दलची वचनबद्धता आम्हाला प्रेरणा देते.

आम्ही फॉरेन कॉमनवेल्थ डेव्हलपमेंट ऑफिसचे, विशेषत: **ममता कोहली**, **जगन शाह**, **संजुक्ता रॉय** आणि **कॅथरीन सार्जेन्ट** यांचे मनापासून आभार मानतो की त्यांनी या कामासाठी अर्थसहाय्य दिले आणि भारतातील शहरी मुलींच्या वास्तविक वास्तवांबद्दल चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी त्यांची वचनबद्धता दर्शविली.

एमपॉवर कडून **जयंती पुष्करन**, वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी (सिनियर प्रोग्राम ऑफिसर) आणि **स्वर्णलता माहिलकर** (गर्लफेलो) यांनी एमपॉवरच्या लीडर लॅबची रचना व सुलभीकरण एक अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम म्हणून केला जिथे संशोधन माहिती व ज्ञान निर्मिती आणि निर्णय घेताना मुली समान भागीदार आणि सहयोगी असतील. **आयसाटौ बह** (संचालक, पौगंडावस्थेतील मुली आणि लिंग पुढाकार) यांनी एमपॉवर लीडर लॅबला प्रयोगसंबंधित मार्गदर्शन आणि समर्थन प्रदान केले आणि लीडर लॅबचं सुलभीकरण करण्यास एक विलक्षण गर्ल फेलो भरती केली. एकत्रितपणे, त्यांनी डेटा विश्लेषण, मुलींच्या अंतर्दृष्टीचे समाकलन आणि अहवाल लिहिण्यास हातभार लावला.

**तन्वी मिश्रा** (वरिष्ठ कम्युनिकेशन्स (संप्रेषण) तज्ञ) यांनी **सारा साद** (कम्युनिकेशन्स फेलो) च्या पाठिंब्याने या अहवालाचे सर्जनशील उत्पादन केले आणि त्या प्रयत्नांचे नेतृत्व करणाऱ्या मुलींना महत्व मिळावे असे सुसज्ज उत्पादन सुनिश्चित केले आहे त्याचबरोबर ह्या अहवालाचे हिंदी, मराठी व इंग्रजी भाषेत प्रकाशनसुध्दा.

**प्राची गुप्ता** [डेव्हलपमेंट स्ट्रॅटेजिस्ट (विकास रणनीतिकार)] यांनी काम प्रस्तावित केले आणि एफसीडीओ बरोबर समन्वय साधला. **निशा धवन** (मुख्य संचालक, भारत) यांनी या प्रकल्पाची कल्पना केली आणि त्याचे धोरण, संशोधन रचना, विश्लेषणात्मक चौकट, डेटा विश्लेषण आणि अहवाल लेखनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी एकत्रितपणे व्यवसायी प्रतिबिंब आणि इनपुट प्रक्रियेची रचना केली.

इतर एमपॉवर कर्मचारी ज्यांनी गंभीर भूमिका बजावल्या आहेत त्यांचा समावेश आहे: **सिन्थिया स्टील** (अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी) यांच्या मार्गदर्शन आणि पुनरावलोकनासाठी. **निकोल रजनी** (स्ट्रॅटेजिक कम्युनिकेशन्स अँड मार्केटींग लीड) ज्यांनी अंतिम अहवालाकडे तिचे संपादकीय डोळे दिले. **क्रिस्टन वुल्फ** (उपाध्यक्ष, कार्यक्रम) यांच्या कार्यक्षेत्रातील अंतर्दृष्टीसाठी. **थिओडोरस क्रोनोपॉलोस** वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी (सिनियर प्रोग्राम ऑफिसर) अँड सेफगार्डिंग लीड ज्यांनी सेफगार्डिंग फ्रेमवर्कचा आढावा घेतला आणि **ईवा रोका** (मूल्यांकन आणि शिक्षण सल्लागार) यांच्या एसटीएटीए कौशल्यासाठी.

भारतातील आमच्या अनुदान भागीदारांनी एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रत्येक संस्थेने अशा प्रतिनिधीची निवड केली ज्याने ऑनबोर्डिंग मध्ये मदत केली, संरक्षणासाठी आणि माहितीपूर्वक संमती मिळवण्यास मदत केली व उपाय योजना करण्यास हातभार लावला आणि मुली संशोधकांना त्यांचे प्रशिक्षण, मुलाखत आणि विश्लेषण यांचे समर्थन केले.

आम्ही या क्षेत्रातील अभ्यासक आणि संशोधक, आमच्या समवयस्कांचे आभार मानू इच्छितो, ज्यांनी आरंभिक संशोधन निष्कर्ष सादर केले होते अशा एका गोलमेजद्वारे आमच्यासह त्यांचे विचार लेखी आणि गोलमेजद्वारे डेटावर त्यांचे प्रतिबिंब आणि अंतर्दृष्टी दिली.

आणि आम्ही आमच्या प्रकाशन संघाबद्दल कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो, ज्यांच्याशिवाय आम्ही हा अहवाल एकत्र ठेवू शकलो नसतो. ग्राफिक डिझाइन आणि स्पष्टीकरणासाठी: **कोकिला भट्टाचार्य,** हिंदी भाषांतरासाठी: **हंसा थाप्लियल** आणि मराठी भाषांतरासाठी: **रिनी फर्नांडिस.** इंग्रजीमध्ये प्रूफरीडिंगसाठी: **कॅरोल परेरा**, हिंदी: **विभा दुबे** आणि मराठी: **रंजना फर्नांडिस**.

सूचितउद्धरण:
एमपॉवर (२०२१). **कोविड तिच्या आवाजात: तरुण मुलींच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्यावर केंद्रीत केलेला सहभागी संशोधन अभ्यास.** दिल्ली: एमपॉवर — उदयोन्मुख मार्केट्स फाउंडेशन.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| परिचय | 02 |
| कार्यपद्धती आणि प्रक्रिया | 04 |
| सोनी वर एक प्रकाशझोत (स्पॉटलाइट) | 10 |
| संशोधक कोण आहेत? | 12 |
| मुली कोण आहेत? | 14 |
| गुणात्मक निष्कर्ष: | 20 |
| शाश्वत विकास ध्येये (सस्टेंबल डेवलपमेंट गोल्स)* यांच्या सह मिळते- जुळते लक्ष्य | 25 |
| भागधारकांची आखणी (मॅपिंग): | 48 |
| एसडीजी (SDG 17) द्वारे पुढील मार्ग | 63 |

# परिचय

शहरात राहणाऱ्या मुलींवर कोविड-१९ चा खरा प्रभाव अद्याप माहित नाही. परंतु आपल्याला एवढं माहिती आहे की महामारी मुळे (पँडेमिक मुळे) मुलींचे जीवन नाटकीयरित्या बदलले आहे. मुलींनी अधिक हिंसाचार अनुभवला आहे. त्यांनी शाळेत जाणे बंद केले आहे (काहींनी कायमस्वरूपी शाळा सोडली), त्यांच्यावरच्या घरगुती जबाबदाऱ्या वाढल्या आणि रोजीरोटी मिळवण्याची साधने कमी झाली. काही समुदायांमध्ये, मुलींना आरोग्य सेवांमध्ये विशेषत: लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य यात मर्यादित उपलब्धता आहे आणि बऱ्याच मुलींसाठी मूलभूत स्वच्छता व स्वच्छता उत्पादने आवाक्याबाहेरची आहेत. मुली नेहमीच शहरातील अदृश्य नागरिक असतात, परंतु लॉकडाउन आणि संचारबंदी मुळे (कर्फ्यू) त्या जिथे राहतात त्या शहरांमध्ये त्यांना प्रवेश नाकारला आहे.

जसे आपणया संकटाला प्रतिसाद देत आहोत, आपण पूर्व- महामारी (पँडेमिक) साम्राज्यवादी जगाकडे परत जाण्याचा विचार करू नये. या महत्वपूर्ण क्षणी, कोविड-१९ महामारी (पँडेमिक) ह्याने एक वर्षांपासून अख्या जगाला रोगग्रस्त केले आहे. आपल्याला संधी मिळालेली आहे की आतापर्यंत ज्या उपाययोजना प्रभावी झाल्या नाहीत त्यांना विसरूनअधिक समावेशक पद्धतीने परत उभे राहावे.

एमपॉवर मध्ये आमचा विश्वास आहे की मुली त्यांच्या स्वत: च्या जीवनातील तज्ञ आहेत आणि व्यवसायी आणि निर्णय घेणा-यांना अर्थपूर्ण मार्गदर्शन करण्यासाठी सर्वोत्तम स्थान आहेत. याचा अर्थ हेतुपुरस्सर मुलींचे ऐकणे, त्यांचे आवाज तळागाळातून केंद्रित करणे, निर्णय घेण्याची जबाबदारी सोपविणे आणि गुंतवणूक त्यांच्याकडे जाईल याची खात्री करणे. या दोहोंमध्ये सत्ता बदलून म्हणजेच निर्णय घेताना आणि स्रोतवाटपात, आम्ही ज्या खरोखर महत्वाच्या आहेत 'त्या म्हणजे मुली' आणि त्यांच्यासाठी महत्वाच्या असलेल्या मुद्द्यांवर प्रकाश टाकतो. हा अहवाल अधिक न्याय्य आणि न्याय्य जग कसे तयार करावे याबद्दल भारताच्या शहरांमधील मुलींची अंतर्दृष्टी सामायिक करतो आणि मुली त्यांचे स्वतःचे भविष्य कसे लिहू शकतात हे आम्हाला दर्शवतो.

यूकेच्या फॉरेन कॉमनवेल्थ अँड डेव्हलपमेंट ऑफिस (एफसीडीओ) च्या पाठिंब्याने आम्ही एमपॉवर लीडर लॅब तयार केली. एमपॉवरने भारतातील शहरी भागातील २५ मुलींसह त्यांच्या समुदायातील १५३ इतर मुलींची मुलाखत घेण्यासाठी आणि त्यांच्या निष्कर्षांचे विश्लेषण करण्यासाठी, तीन महिन्यांच्या सहभागी संशोधन प्रयोगशाळेची रचना केली आणि ती तयार केली. या सहभागी कृती संशोधन प्रकल्पाच्या (पीएआर) रचनेची आणि अंमलबजावणी ची जबाबदारी मुलींवर होती. एमपॉवर लीडरलॅब एक ज्ञान आणि शिक्षण केंद्र आहे: एक मिश्रित आणि सहयोगी शिक्षण कार्यक्रम जिथे मुलींना त्यांचे नेतृत्व, गंभीर विचार आणि संशोधन कौशल्ये संकटात व संकटाच्या पलीकडे विकसित करण्यासाठी, आधार देण्यासाठी ऑन द ग्राउंड संशोधन प्रशिक्षणासह ऑनलाइन मास्टरक्लासेस एकत्रित करतो.

मुलींकडून आम्हाला मिळणारी सर्वात मोठी शिकवणी म्हणजे त्या अल्प-मुदतीच्या पलीकडे पहात आहेत; त्या भविष्याकडे लक्ष देत आहेत. त्वरित मदत आणि सेवा वितरणास प्राधान्य दिले गेले आहे, परंतु मुली एक अधिक न्याय्यी, सर्वसमावेशक आणि न्याय्यी जगात त्यांच्या भविष्याची कल्पना करीत आहेत जिथे त्या राहतात त्या शहरांचे सक्रिय नागरिक म्हणून. अर्थव्यवस्था, संस्था आणि शाळा हळूहळू पुन्हा सुरू होत असताना दीर्घकालीन प्रणालीगत बदलघडवून आणण्यासाठी तेआम्हाला आग्रह करीत आहेत.

या अहवालाच्या निकालांमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास लक्ष्यांसह (एसडीजी) एकाधिक धोरण मांडणीसह (पॉलिसी फ्रेमवर्क) संरेखित करण्याची क्षमता आहे. मुलींचा सल्ला त्यांच्या जीवनातील अनुभवांमुळेच गंभीर आहे, परंतु हे देखील महत्त्वाचे आहे कारण ते एसडीजींच्या उद्दीष्टांशी बोलते आणि त्यास दृढ करते, ज्याचा आम्ही डेटा आणि त्यांच्या शिफारसी तयार करण्यासाठी वापरला आहे.

विशेषतः आम्ही अधिक भर देतोय;

एसडीजी 3 वर: चांगले आरोग्य आणि कल्याण;

एसडीजी 4 वर: उच्च गुणवत्तेचे शिक्षण;

एसडीजी 8 वर: सभ्य कार्य आणि आर्थिक वाढ;

एसडीजी 11 वर: शाश्वत शहरे आणि समुदाय.

आमचा असा विश्वास आहे की एसडीजी ५ वर: लिंग समानता आणि एसडीजी १० वर: कमी केलेल्या असमानता मुलींच्या शिफारशींच्या केंद्रस्थानी आहेत आणि इतर एसडीजी साध्य करण्यासाठी मध्यवर्ती आहेत. केवळ या सल्ल्यानुसार सहकार्याने कार्य केल्याने आपण परिवर्तनकारी बदलाची आशा करू शकतो. म्हणूनच, आम्ही एसडीजी १७: भागीदारी द्वारे या कार्यासाठी भविष्यातील मार्ग तयार करतो.

हा अहवाल आमच्या त्या महत्वाकांक्षांचे मूर्तिमंत रूप आहे जेणेकरून ह्या मुलींचा आवाज व शहाणपण वाढवण्यास सहाय्यक आहे. या प्रक्रियेत आम्ही मोठ्या इकोसिस्टमला अर्थपूर्णपणे गुंतवण्यासाठी, ऐकण्यासाठी व मुलींच्या शिफारसीद्वारे मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करतो.

## मार्गदर्शक तत्त्वे

एमपॉवरचा असा विश्वास आहे की मुली आणि युवतींना गुंतवून ठेवण्याची प्रक्रिया संशोधनाच्या निकालासाठी मुख्य आहे आणि ती स्वतःतच महत्त्वाची आहे. हा अहवाल किशोरवयीन मुलींना प्राथमिक संशोधक व प्रतिसादकर्ता म्हणून महत्व देतो. या सहभागी संशोधन अभ्यासाची मूलभूत मार्गदर्शक तत्त्वे आहेतः

- मुलींच्या जीवनातील सर्वात मोठे तज्ञ स्वतः मुलीच आहेत.
- अभ्यासाचे नेतृत्व मुलींच्या नेतृत्वात आहे आणि ते त्यांच्या विशिष्ट दृष्टीकोन आणि जिवंत वास्तवाचे प्रमाण आहे.
- सर्व प्रक्रिया आणि निर्णय घेणारे संदर्भ-बिंदू, युवती नेत्यांचा हेतूपूर्ण सहभाग सुनिश्चित करण्यासाठी रचले होते. त्यांचे दृष्टीकोन आणि अंतर्दृष्टी संशोधन प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर वैशिष्ट्यीकृत व हिशोबीत केले गेले होते.
- हे संशोधन नुसते मुली आणि तरुण स्त्रियांवर नसून त्या ऐवजी त्यांच्या सोबत केले गेले आहे. संपूर्ण प्रक्रियेत युवती नेत्यांना (काही गोष्टी) ध्यानात ठेऊन करण्यास सांगितले होते: (उदाहरणार्थ)

o समुदायाच्या संदर्भात चिंतन करा.
o पुनरावृत्ती मुलाखत शैलीची खात्री करा, जेणेकरून प्रतिसादक त्यांच्या अनुभवांवर एकापेक्षा जास्त प्रकारे प्रतिसाद देऊ शकतील आणि प्रतिबिंबित करु शकतील.
o प्रतिसादक आणि स्वत: ला शिक्षणामधील महत्त्वाचे कलाकार म्हणून पहा.

# कार्यपद्धती आणि प्रक्रिया

### पहिला टप्पा लीडर लॅब सुरू करणे

एमपॉवरने त्यांच्या अनुदान भागीदारांपैकी ३० भागीदारांशी संपर्क साधला, ज्यांनी त्यांच्या समुदायातील मुलींची शिफारस केली जे: १३ ते २४ वयोगटातील होते, शहरी भागात राहत होते, ज्यांनी नेतृत्व प्रदर्शन केले होते (प्रात्यक्षिक नेतृत्व) व त्यांच्या समाजातील किशोरवयीन मुलींना भेडसावणाऱ्या समस्यांविषयी त्यांना चांगली माहिती होती.


लीडर लॅबचे पहिले सदस्य होण्यासाठी पंचवीस नेते हे अहमदाबाद, अलवार, बरेली, दिल्ली, लखनौ, मुंबई, आणि पुणे येथून निवडले गेले होते.

### दुसरा टप्पा संशोधन योजनेची रचना आणि चाचणी

एमपॉवर कर्मचाऱ्यांनी प्रश्नावलीच्या विकासास मार्गदर्शन करण्यासाठी सात मुली नेत्यांची त्यांच्या अंतर्दृष्टीसाठी मदत घेतली. मुलींनी प्रश्नावली पत्रिकेत बदल केले, जसे की लोकसंख्याशास्त्रीय (डेमोग्राफिक) विभागात वैवाहिक स्थिती जोडणे आणि प्रतिबिंबांसाठी सीमित प्रश्नांमध्ये अधिक जागा प्रदान करणे. परिणामी, प्रश्नावलीमध्ये ४८ निकटवर्ती आणि तीन मुक्त प्रश्नांचा समावेश होता, प्रत्येकाला दोन ते चार उप प्रश्न होते.

मुली नेत्यांना तांत्रिक आणि सौम्य संशोधन कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी एमपॉवरने दोन संच ऑनलाईन मास्टरक्लास तयार केले ज्याच्यामुळे त्यांचे मुलाखत कौशल्य, सुरक्षात्मक साधने, कोविड-१९ संबंधित खबरदारी उंचावली जाईल आणि मुलाखत निवडीसाठी निकष विकसित करणे यावर लक्ष केंद्रित केले. महत्त्वाचे म्हणजे, यामुळे मुली नेत्यांना एमपॉवरला टीकाकुशल अभिप्राय देण्यासाठी जागा निर्माण झाली.

### तिसरा टप्पा क्षेत्राभ्यास



मुली नेत्यांनी त्यांच्या समुदायात संशोधन केले आणि प्रत्येकीने सहा मुलींची मुलाखत घेतली. यावेळी, एमपॉवरने मुली नेत्यांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी किंवा त्यांच्या क्षेत्रातील आव्हानांवर चर्चा करण्यासाठी दोन पर्यायी चेक-इन कॉल आयोजित केले. याव्यतिरिक्त, सर्व मुली नेत्यांनी संशोधन निष्कर्ष आणि निकालांची पुढील माहिती अधिक समृद्ध करण्यासाठी त्यांनी त्यांची निरीक्षणे व अनुभव दस्तऐवजीकरण करण्यासाठी नोंद वही (फील्ड डायरी) ठेवली. संशोधनाच्या अंतिम टप्प्यात, मुली नेत्यांनी त्यांची अंतर्दृष्टी, आव्हाने, अनुभव आणि शिकवणी सामायिक करण्यासाठी या नोट्सचा आधार घेतला, ज्यामुळे मुलींचे जीवन समजून घेण्याची चौकट मोठ्या प्रमाणात विस्तृत झाली, विशेषत: महामारी मध्ये (पँडेमिक मध्ये).

### चौथा टप्पा डेटा विश्लेषण आणि अंतर्दृष्टी

एमपॉवर कर्मचाऱ्यांनी सर्व मुक्त प्रश्नांचे गट करण्यासाठी एक तळातून वर कोडिंग दृष्टीकोन विकसित केला. वय, स्थान, जाति आणि धर्म यासारख्या लोकसंख्याशास्त्रीय डेटाविरूद्धच्या प्रतिक्रियेचे द्विपक्षीय विश्लेषण करण्यासाठी एमपॉवरने एसटीएटीएद्वारे डेटा चाळला. मुलींनी जाती आणि धर्माच्या भिंगाद्वारे डेटा तपासण्याचे महत्त्व सांगितले आणि शेवटी काम केलेल्या द्विपक्षीय विश्लेषणाची रचना निश्चित केली. त्यानंतर एमपॉवरने हे मुली नेत्यांसमोर त्यांच्या विश्लेषणासाठी मास्टरक्लासमध्ये प्राथमिक कल आणि निष्कर्ष सामायिक केले आणि अंतिम अहवालात काय वैशिष्ट्यीकृत केले जाईल हे या मुली नेत्यांनी एकत्रितपणे ठरवले.

एमपॉवर संघाने व्यावसायिकांच्या (प्रॅक्टिशनर्सच्या) गटाची मदत घेतली, ज्यांनी प्राथमिक निष्कर्षांवर त्यांचे दृष्टीकोन आणि अंतर्दृष्टी प्रदान केली. या गटात व्यवसायी (प्रॅक्टिशनर), देणगीदार संस्था, शिक्षणतज्ज्ञ तसेच एमपॉवरच्या सल्लागार समितीतल्या मुली, जे त्यांच्या भारतातील प्रोग्रॅमॅटिक धोरणावर एमपॉवरला सल्ला देतात अशा १६ मुलींचा समूह होता. ही प्रक्रिया आभासी गोलमेज येथे झाली जिथे मुली नेत्यांनी त्यांचे निष्कर्ष भागधारकांच्या विस्तृत स्पेक्ट्रममध्ये सादर केले त्यांच्या अंतर्दृष्टी व प्रतिबिंबांसाठी जे अंतिम अहवालात समाविष्ट केले गेले.



“लोकसंख्याशास्त्रीय माहितीत वैवाहिक स्थिती जोडल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करते - याचा अर्थ असा होतो की विवाहित मुलींना प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले गेले (किंवा वगळलेले नाही). हे महत्वाचे आहे कारण सामान्यत: ज्या मुलींची आधीच लग्न झालेली आहेत त्या स्वयंसेवी संस्थांच्या हस्तक्षेपातून दुर्लक्षित होतात आणि सहसा अशा कार्यक्रमांमधून वगळले जातात जे अल्पवयीन विवाह रोखण्यावर किंवा अविवाहित मुलींसह हस्तक्षेप करण्यावर लक्ष केंद्रित करतात.”

- मंजिमा भट्टाचार्या,
वरिष्ठ सल्लागार, अमेरिकन ज्यूइश वर्ल्ड सर्व्हिस.

## मर्यादा

या अभ्यासाने सहभागी आणि संशोधक यांच्यात नि:पक्षपातीपणा आणि मोकळेपणा कायम ठेवला आहे आणि रचना, अंमलबजावणी, निरीक्षण आणि चिंतन या महत्त्वपूर्ण टप्प्यांवर एक प्रतिक्षिप्त प्रक्रिया सुनिश्चित केली आहे, त्यास खालील मर्यादा आहेत:

१. हा अभ्यास संशोधकांच्या समज आणि विचारांवर अवलंबून होता, हे एक आवश्यक व विशिष्ट वैशिष्ट्य आहे. तथापि, विषयीभाव निष्कर्षांमध्ये शिरू शकते.

२. मुली नेते पहिल्यांदाच संशोधकाच्या भूमिकेत आल्या होत्या आणि त्यांच्या संशोधन तंत्राची कठोरता त्यांच्या मर्यादित अनुभवांवर व त्यांनी एमपॉवरच्या लीडर लॅबद्वारे मिळवलेल्या संशोधन कौशल्यांवर अवलंबून होती.

३. हा अभ्यास कोविड -१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर घेण्यात आला. संशोधनावर लक्ष केंद्रित करत असताना मुलाखत घेणाऱ्यांची सुरक्षा निश्चित करण्याचे संतुलन कार्य उत्तम वेळी आव्हानात्मक ठरते, मग 'सुई जेनेरीस' संकट परिस्थिती तर कल्पनेच्या बाहेर आहे.

४. उपेक्षित अतिपरिचित भागात राहणाऱ्या मुलींना जागेच्या मर्यादेसह घरी अनेक निर्बंधांचा सामना करावा लागतो. जरी संशोधकांनी विश्वासाचे वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला, तरीही त्यांनी नोंदवले की काही सहभागींनी त्यांच्या कुटुंबाच्या उपस्थितीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास संकोच केला, ज्यामुळे त्यांना मन मोकळेपणाने बोलता आले नाही.

५. संशोधकांनी खालील आव्हाने देखील नोंदवली

अ) मुलाखती दरम्यान काही दिलेली उत्तरे न समजल्यामुळे मुली संशोधकांनी त्यांच्या नोट्समध्ये काही तपशील वगळले.

ब) त्यांनी नमूद केले की काही प्रतिसादक सामाजिकदृष्ट्या अनिष्टित उत्तरे देण्यात संकोच करीत होते.



## संस्थात्मक प्रतिनिधींची भूमिका

प्रत्येक अनुदान भागीदाराने एका संघटनात्मक प्रतिनिधीची नेमणूक केली ज्याने:

• सुरुवातीपासून शेवटपर्यंत मुलींना आधार देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
• प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यात संरक्षणाची हमी दिली.
• मुलींना त्यांचे पूर्ण केलेले मुलाखत फॉर्म एमपॉवरसह सामायिक करण्यास समर्थन दिले.

“आपल्या किशोरवयीन मुलींकडून जीवनातील काही महत्त्वाचे धडे घेतले जाऊ शकतात ते म्हणजे निराश न होता सध्याच्या परिस्थितीशी लवचिक राहणे व जुळवून घेणे. परिस्थिती काहीही असो परंतु हार न मानण्याची वृत्ती ही माझ्यासाठी महत्त्वाची शिकवण आहे. तसेच, या संपूर्ण परिस्थिती मुळे मला मुलींसाठी आणि माझ्यासाठी अधिक कार्यक्षमतेने कार्य करण्यास प्रवृत्त केले आहे.”

- वृन्दा बजाज
लीडर लॅब, स्वेच्छा मधील संघटनात्मक प्रतिनिधी

## संरक्षणाविषयी विचार

लीडर लॅबच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतच्या रचनेमध्ये संरक्षण हे मध्यवर्ती होते.

एमपॉवरने :

• सल्लागार, संघटनात्मक प्रतिनिधी आणि मुली नेत्यांसह संरक्षणाची चर्चा केली.
• तपशीलवार जोखीम नोंदणी तयार केली.
• मुली नेत्यांशी संवाद साधला की ते नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यासह सुरक्षिततेचे प्रश्न उपस्थित करू शकतात.
• मुली नेत्यांना स्टायपेंड प्रदान केले - कोविड -१९ किट, संरक्षक गियर आणि प्रवासासाठी अतिरिक्त भत्ते यासह.
• अभ्यासाच्या प्रत्येक टप्प्यावर मुली नेते आणि प्रतिसादकर्त्यांकडून माहितीची संमती प्राप्त केली. जर ते १८ वर्षाखालील असतील तर त्यांच्या पालकांनी संमती फॉर्मवर स्वाक्षरी केली.

“मी प्रतिवादीच्या वडिलांना समजावून सांगितले की गोळा केलेला डेटा गोपनीय असेल. मी सामायिक केले आहे की आपण सर्वांनी मान्य केलेली मुलाखतच आम्ही घेऊ आणि जर तुमची मुलगी मुलाखतीद्वारे काही आक्षेप घेत असेल तर मी मुलाखत घेणे तिथेच थांबवीन".

— अवदा बी
दिल्ली लीडर लॅब

## प्रतिसादक विरूद्ध संशोधक

लीडरलॅबमध्ये ज्या १५३ मुलाखती घेतल्या गेल्या त्याच समाजातील मुलींचा समावेश आहे, परंतु संशोधन रचनेने संशोधकांना मुलाखतीत भाग घेण्यास वगळले. यामुळे मुली नेत्यांना त्यांनी संशोधकांच्या भूमिकेत गोळा केलेल्या डेटाचे विश्लेषण करण्याची परवानगी दिली. मुली नेत्यांचा त्यांच्या प्रतिसादकर्त्यांशी संबंध प्रस्थापित असल्यामुळे संशोधन क्षेत्रात आस्तित्वात असलेले संशोधक व प्रतिवादी यांच्यातल्या पॉवर डायनॅमिक्सला मोडून टाकता आले. मुली नेत्यांच्या म्हणण्यानुसार हे तीन गोष्टींमुळे झाले:

**सहानुभूती**

बऱ्याच मुलींसाठी त्यांचे अनुभव सामायिक करणे एक कठीण भावनिक अनुभव होता. त्यांनी (मुली संशोधकांनी) सांगितले की मुली त्यांच्याकडे मनमोकळेपणाने बोलू शकल्या कारण त्या देखील त्याच समाजातील मुली होत्या. “त्यांचे अनुभव माझे व माझ्या समाजातील इतर मुलींसारखेच होते. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला आणि मुलाखतीच्या प्रश्नांच्या पलीकडे जाऊन बऱ्याच गोष्टी सांगितल्या. जरी मी त्यांच्याशी प्रथमच बोलत होते, तरीही मी त्यांचे म्हणणे संशोधक म्हणून ऐकले व मैत्रीण म्हणून देखील ऐकले. त्यांनी मला एक अशी व्यक्ती म्हणून पाहिले ज्याला त्यांच्यासमोर असलेल्या समस्या समजतात कारण आम्ही समान आहोत.”
- सोनी, (२०, दिल्ली)

**विश्वास निर्माण करणे**

मुली नेत्यांचा असा विश्वास होता की ते विश्वास वाढविण्यात सक्षम आहेत. “मुलींना मासिक पाळी, स्वातंत्र्याचा अभाव आणि त्यांच्यावर लग्न करण्यासाठी आणलेला दबाव यासारख्या मुद्द्यांविषयी बोलणे कठीण होते. मी त्यांना सांगितले की या गोष्टींबद्दल बोलणे ठीक आहे व लाजायची किंवा घाबरण्याची गरज नाही. जेव्हा तिला समजले की मी स्वत: बिंधास्त आहे तेव्हा ती हळूहळू मनमोकळेपणाने बोलू लागली व तिने  प्रश्नांची उत्तरे दिली. ”- प्रिया, (२३, लखनौ).

**स्वतःच मत न देता प्रतिसादकांचे ऐकणे**

अंजुम (१६, मुंबई) हिने “मुलींना कोणत्याही व्यत्ययाशिवाय स्वतःची कहाणी सांगण्यास प्रोत्साहित करणे कसे उपयुक्त ठरेल हे वर्णन केले. मी शांत होते आणि त्या काहीतरी वेगळं बोलत असतानाही मी [संभाषण] नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला नाही. या दृष्टिकोनामुळे मुलींना मनमोकळेपणाने बोलण्यास मदत झाली. पालक व प्रौढांसारखे मतं न देता तिला जे म्हणायचे होते ते मी ऐकले.”



## एमपॉवर लीडर लॅबमधून प्राप्त केलेली कौशल्ये व ज्ञान

मुली नेत्यांनी नवीन कौशल्ये व ज्ञान मिळवल्याची नोंद केली.

त्यांनी:

- त्यांच्या समवयस्कांचे, त्यांचे अनुभव आणि वास्तविक वास्तवाचे प्रासंगिक ज्ञान प्राप्त केले.
- कोविड-१९ ने मुली आणि तरूणींवर कसा परिणाम झाला याची चांगली समज प्राप्त झाली.
- संशोधन करण्याची, मुलाखती घेण्याची, डेटा संकलित आणि विश्लेषित करण्याची त्यांची क्षमता सुधारली.
- त्यांची ऐकण्याची कौशल्ये, सहानुभूती व सन्मानाची भावना हे इतर मुलींसह कुशलतेने कार्य करताना सुधारित गेले.
- संशोधनात माहितीपूर्ण संमती आणि गोपनीयतेचे महत्त्व जाणून घेतले.
- नवीन लोकांशी बोलताना भीती व संकोच कमी झाला.

# सोनी वर एक प्रकाशझोत (स्पॉटलाइट)

“मी स्वत: ला एक संशोधक म्हणून पाहते,” सोनीने स्वत: ला नेता असल्याचे मानले का असे विचारले तेव्हा ती म्हणाली.
“मी मुलींची मुलाखत घेऊ शकते कारण मी अशा प्रकारे प्रश्न विचारण्यास सक्षम आहे ज्यामुळे त्यांना आत्मविश्वास वाटेल. त्यांना वाटते की ते माझ्याजवळ मनमोकळेपणाने बोलू शकतात आणि त्यांचे विचार व त्यांच्या जीवनाशी संबंधित तपशील माझ्याकडे व्यक्त करू शकतात. मला खात्री आहे की मी नवीन लोकांशी बोलू शकते आणि भविष्यातही अशा मुलाखती घेऊ शकते.”



“सुरुवातीला मुलाखती घेताना मला काही आव्हानांचा सामना करावा लागला. काही लोक (मला) संशयास्पद रितीने पाहत होते. त्यांना मी, एक अनोळखी व्यक्ती, त्यांच्या मुलींची मुलाखत घेऊ नये अशी त्यांची इच्छा होती. पण मी धीर धरला. मी शांतता राखली व माझे कार्य महत्वाचे आहे याची पालकांना खात्री पटवून दिली.”

- सोनी
वय २०, मुंबई

सोनीचा आत्मविश्वास संसर्गजन्य आहे. २५ बळकट मुली नेत्यांच्या पथकाचा एक भाग म्हणून तिने वेगवेगळ्या समुदायातील सहा मुलींची मुलाखत घेतली. ती म्हणाली, “मला वेगवेगळ्या गटांपर्यंत पोहोचण्याची इच्छा होती. “कोविड-१९ (महामारी) व त्यानंतरच्या लॉकडाऊनमुळे लोकांच्या जीवनावर जो काय परिणाम झाला विशेषत: मुलींवर तो सर्वात जास्त झाला.”

नवीन कौशल्ये मिळविण्यासाठी व नवीन लोकांना भेटण्यासाठी ती एमपॉवर लीडर लॅबमध्ये सामील झाली, तेव्हा पहिले काही दिवस फार कठीण गेले. तिला केवळ संशोधक होण्याची आणि वेगवेगळ्या मुलाखतीच्या पद्धतींशी परिचित होण्याचीच सवय नव्हती, तर तिने तिच्यासाठी नवीन आणि तिच्या घरापासून दूर असलेले समुदाय निवडले होते.

सोनी ह्या आव्हानांमुळे खचली नाही. तिचा प्रवास तिने मुलाखत घेतलेल्या मुलींपेक्षा फारसा वेगळा नाही. उत्तर प्रदेशातील एका छोट्या खेड्यातून असून, ती गंभीर आजारी पडल्यानंतर मुंबईला स्थलांतरित झाली. तिचे पालक यापूर्वी कामासाठी शहरात गेले होते. तिच्या आजारपणामुळे आणि कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीमुळे तिला तीन वर्षे शिक्षण बंद करावे लागले. वाचा चॅरिटेबल ट्रस्टने चालविलेल्या महिला आणि मुलींच्या कार्यक्रमात सामील झाल्यावर तिने शाळेत पुन्हा प्रवेश केला.

सोनी तिची पदवी पूर्ण करीत आहे, आणि लीडर लॅबमध्ये भाग घेतल्यापासून, तिने मुलाखत घेतलेल्या मुलींपैकी एकीला मदत करीत आहे. “मी ज्या मुलींची मुलाखत घेतली त्यापैकी एक मानसिक अपंगत्वासह जीवन जगते. आजूबाजूची लोक तिच्याकडे दुर्लक्ष करतात. म्हणून मी तिला दररोज एक तास भेटते व तिला शिकविते, तिच्याशी बोलते. तिला बरं वाटतं आणि मला सुद्धा.”

# संशोधक कोण आहेत?

## एम्पावर लीडर्स लैब


**पूजा दिनेश गोटल**
19, मुंबई


**मोनिका**
19, नई दिल्ली


**खुरशीदा**
20, लखनऊ


**गीता दीपक चवण**
21, पुणे


**शाहजहां खातून सलाउद्दीन इदरीसी**
18, मुंबई


**आवदा**
21, नई दिल्ली


**ज्योति बाई**
24, अल्वार


**नेहा विनायक कालभोर**
18, पुणे


**ललिता**
16, नई दिल्ली


**नेत्रवती निंगप्पा नदविनमणि**
19, मुंबई


**प्रीती सिंह**
24, नई दिल्ली


**अंजुम परवीन मौहम्मद कमर शेख**
16, मुंबई


**शुभांगी रमेश जाधव**
18, पुणे


**प्रिया कैथवास**
23, लखनऊ


**रानी रावत**
20, नई दिल्ली


**सोनी कमलेश भारती**
20, मुंबई


**राधा**
23, अलवर


**शिरीन अंसारी**
22, मुंबई


**श्रेया रमेश राजबहूर**
13, मुंबई


**ज़ला वंसिता प्रकाशभाई**
17, अहमदाबाद


**रौशनी भारती**
16, लखनऊ


**आलिया वहीद भलदार**
18, पुणे


**अलवीश**
14, बरेली



**जोहा ज़ाकिर**
18, मुंबई


**रिचा**
18, अहमदाबाद

# मुली कोण आहेत?


**153** या प्रकल्पाचा एक भाग म्हणून सात शहरांमधील उपेक्षित सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीतून असलेल्या १५३ मुलींची मुलाखत घेण्यात आली. या मुली त्यांच्या लिंग, जाती, विश्वास आणि इतर अनेक कारणांमुळे काठावर (मार्जिन) असलेल्या समुदायांमधून येतात. ते आहेत, शहरातील अदृश्य नागरिक.

## वय





## स्थान

शहराद्वारे उत्तर देणा देणाऱ्यांची संख्या





| वय | अहमदाबाद | अल्वार | बरेली | दिल्ली | लखनौ | मुंबई | पुणे | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10-14 | 1 | 1 | 0 | 2 | 1 | 5 | 1 | 11 |
| 15-19 | 9 | 5 | 5 | 21 | 9 | 30 | 19 | 98 |
| 20-24 | 2 | 6 | 1 | 9 | 8 | 13 | 5 | 44 |
| एकूण | 12 | 12 | 6 | 32 | 18 | 48 | 25 | 153 |





**100%**

प्रतिसादक महिला म्हणून ओळखल्या गेल्या



**96%**

प्रतिसादकांना कोविड -१९ बद्दल माहिती होती.



- लॉकडाउन दरम्यान १०% प्रतिसादक त्यांच्या गावी परतले.
- मुलींनी अहमदाबाद, अल्वार, मुंबई, पुणे आणि लखनौ येथून प्रवास केला.
- लॉकडाउन दरम्यान बरेली किंवा दिल्लीतील कोणत्याही मुलीने शहर सोडले नाही.



**3%**


अपंग म्हणून ओळखले गेले.



**6%**


प्रतिसादक विवाहीत होते.

## धर्म





धर्माच्या अनुसार उत्तर देणाऱ्यांची संख्या

## जाती





जातीच्या अनुसार उत्तर देणाऱ्यांची संख्या

## कुटुंब





## भावंडं




- प्रतिसादकर्त्यांचे सरासरी कौटुंबिक आकार 5.5 लोक होती.
- सामान्यत: मुली कुटुंबातील इतर चार सदस्यांसह राहत असत.
- सरासरी, आमच्या प्रतिसादकर्त्यांना 2.95 भावंडे होती व सामान्यत: दोन भावंडे होती.
- 70% प्रतिसादकांना लहान भावंडे होती, हे मुलाच्या पसंतीचे सूचक आहे.


## शिक्षणाची पातळी

शिक्षणाच्या पातळीच्या अनुसार उत्तर देणाऱ्यांची संख्या




** वर्ग ५,६, १० आणि १२ ही शाळा प्रणालीतील अंतिम वर्ष आहेत

## बोलल्या जाणाऱ्या भाषा




### 10-14 years

- या वयोगटाचे प्रतिनिधित्व ५ शहरांमधील ११ मुलींनी केले होते: दिल्ली, मुंबई, लखनौ, अहमदाबाद व अल्वार आणि त्यातील ७% प्रतिसादक आहेत.
- ११ पैकी ४ मुली घरातल्या कामांसाठी जबाबदार आहेत.
- केवळ १ मुलीचा असा विश्वास आहे की मुलींना वगळण्यात त्यांच्या जाती, वर्ग किंवा अपंगत्वाची भूमिका आहे.
- या गटातील मासिक पाळी येणाऱ्या ९ मुलींपैकी, बहुतेक सॅनिटरी रुमाल (नॅपकिन) वापरतात आणि १ कापड वापरते.
- ११ पैकी ८ मुलींनी मानसिक आरोग्यावर काही प्रमाणात परिणाम झाल्याची नोंद केली.
- १ मुलीने तिच्या आजूबाजूला लैंगिक हिंसाचारात झालेली वाढ नोंदविली.

### 15-19 years

- या वयोगटातील या अभ्यासात सर्व ७ शहरांमधील ९७ मुलींनी प्रतिनिधित्व केले होते आणि त्यातील ६३% प्रतिसादक आहेत.
- ९७ पैकी ८१ मुली घरातल्या कामांसाठी जबाबदार आहेत
- २२ मुलींचा असा विश्वास आहे की मुलींना वगळण्यात त्यांच्या जाती, वर्ग किंवा अपंगत्वाची भूमिका आहे.
- मासिक पाळी येणाऱ्या या गटातील ९४ मुलींपैकी, ८० सॅनिटरी नॅपकिन वापरतात, १३ कापड वापरतात आणि १ मासिक पाळीचा कप वापरते
- ८८ मुलींनी मानसिक आरोग्यावर काही प्रमाणात परिणाम झाल्याची नोंद केली
- २६ मुलींनी त्यांच्या आजूबाजूला लैंगिक हिंसाचारात झालेली वाढ नोंदविली

### 20-24 years

- या वयोगटातील या अभ्यासात सर्व ७ शहरांमधील ४४ मुलींनी प्रतिनिधित्व केले होते आणि त्यातील २९% प्रतिसादक आहेत.
- ४४ पैकी ३७ मुली घरातल्या कामांसाठी जबाबदार आहेत
- ९ मुलींचा असा विश्वास आहे की मुलींना वगळण्यात त्यांच्या जाती, वर्ग किंवा अपंगत्वाची भूमिका आहे.
- मासिक पाळी येणाऱ्या या गटातील ४३ मुलींपैकी, ३८ सॅनिटरी नॅपकिन वापरतात, ४ कापड वापरतात आणि १ मासिक पाळीचा कप वापरते
- ४१ मुलींनी मानसिक आरोग्यावर काही प्रमाणात परिणाम झाल्याची नोंद केली
- १२ मुलींनी त्यांच्या आजूबाजूला लैंगिक हिंसाचारात झालेली वाढ नोंदविली

# शहरांवर प्रकाशझोत (स्पॉटलाइट)

## अहमदाबाद

अहमदाबाद मधील कोणत्याही मुलीचा विश्वास नाही की:

- लैंगिक हिंसाचारात (जीबीव्ही) लॉकडाउनमुळे वाढ झाली आहे
- काही मुलींवर कोविडचा परिणाम इतरांपेक्षा जास्त होत आहे
- मुलींना वगळण्यात त्यांच्या जाती, वर्ग किंवा अपंगत्वाची भूमिका आहे

-सर्व मुलींनी मास्क्स, जंतुनाशक द्रव्य आणि हातधुण्याच्या सुविधांची उपलबध्दता असल्याची माहिती दिली.

## बरेली

83%

मुली त्यांच्या करिअरच्या संभावनांबद्दल आशावादी होत्या, जे सरासरी निकालापेक्षा किंचित जास्त होते (82%).

### लॉकडाउन पूर्वी

6 पैकी 5 मुली शाळेत दाखल झाल्या होत्या - आता फक्त 2 मुली शाळेत आहेत.

1/2

बरेलीमधील अर्ध्या मुलींचा असा विश्वास आहे की लैंगिक हिंसाचारात (जीबीव्ही) वाढ झाली आहे (6 पैकी 3 मुली).

## पुणे

18%

ज्या 42% लोकांचा असा विश्वास आहे की कोविड दरम्यान लग्नाचा दबाव वाढला आहे, त्यातले 18% पुण्याचे होते.

45% वर, पुणे येथे त्यांच्या कुटुंबियांसह शहरात स्थलांतरित झालेल्यांपैकी सर्वाधिक प्रतिसादक होते.

44% या अभ्यासाच्या ७ शहरांपैकी, पुणे येथील मुली त्यांच्या करिअरच्या संभावनांबद्दल सर्वात कमी आशावादी होत्या.

## लखनौ

55% लॉकडाउन दरम्यान लैंगिक हिंसाचारात (जीबीव्हीमध्ये) वाढ झाली आहे असा विश्वास असणाऱ्या 55% मुली लखनौच्या आहेत.

17/18

मुली म्हणाल्या की घरगुती काम ही त्यांची जबाबदारी आहे आणि त्यापैकी कोणालाही पुरुष नातेवाईकांकडून कोणतीही मदत मिळत नाही.

### लॉकडाउन करण्यापूर्वी

18 पैकी 7 मुली शाळेत नव्हत्या.

## अल्वार

41% लॉकडाउन दरम्यान लैंगिक हिंसाचारात (जीबीव्हीमध्ये) वाढ झाली आहे असा विश्वास असलेल्या २६% मुलींपैकी, ४१% अल्वार मधील आहेत.

5/6


१२ पैकी १० मुलींनी मानसिक आरोग्यावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे नोंदविले.

सर्व

मुलींनी लग्नासाठी दबाव वाढवल्याची नोंद केली

## दिल्ली

65% मुली सध्या शाळेत आहेत.




ऑनलाइन शिकत असलेल्या 27 मुलींपैकी 28 (66%) मुलींना हे अवघड वाटते.


### लॉकडाउन दरम्यान

दिल्लीतील कोणत्याही मुलीने शहर सोडले नाही

## मुंबई

30% ज्या 42% प्रतिसादकांचा असा विश्वास आहे की कोविड दरम्यान लग्नाचा दबाव वाढला आहे, त्यातले 30% मुंबईचे होते.

ज्या 29% प्रतिसादकांचा असा विचार आहे की मुलींना वगळण्यात त्यांच्या जाती, वर्ग किंवा अपंगत्वाची भूमिका आहे, त्यातले 34% मुंबईचे आहेत




## महानगर (मेट्रो)

शाळेत नसलेल्या 30% मुलींपैकी 55% महानगरातून (मेट्रो शहरातील) आहेत.

52% 80 मुली किंवा 52% प्रतिसादक भारतातील महानगरातून (मेट्रो शहरांमधून) आहेत.

ज्या मुलींकडे शिकण्यासाठी लागणाऱ्या साधनांची उपलबध्दता आहे त्यापैकी निम्म्याहून अधिक मुली महानगरातून (मेट्रो शहरांमधून) आहेत

महानगरातील (मेट्रो शहरांमधील) मुली छोट्या शहरातील (नॉन-मेट्रो शहरांमधील) मुलींपेक्षा त्यांच्या करिअरच्या संभावनांबद्दल कमी आशावादी आहेत (मुंबई 68% प्रतिसादक, दिल्ली 71%. सरासरी निकाल: 82%)

## शहरात स्थलांतर

68% लोक सध्या राहत असलेल्या शहरात जन्मले आणि 32% शहरात स्थलांतरित झाले.

ज्यांनी शहरात स्थलांतरकेले त्यांच्यापैकी:

- 31 % मुंबईला गेले.
- मुंबई शहरातील सर्व प्रतिसादकांपैकी 34% लोक स्थलांतरित होते.
- शहरात स्थलांतरित झालेल्या 37% मुली एस सी / एस टी / ओ बी सी म्हणून ओळखले जातात
- सर्व स्थलांतरितांपैकी 24% मुस्लिम आणि 56% हिंदू होते.

45% वर, पुणे शहरात स्थलांतरित झालेल्या लोकांची संख्या सर्वाधिक होती.

# गुणात्मक निष्कर्ष

मुलींचे आवाज आणि त्यांचे महत्त्वपूर्ण दृष्टीकोन जाणून घेण्याच्या उद्देशाने, लीडर लॅबने मुक्त प्रश्नांचा एक संच तयार केला जेणेकरून उत्तर देणाऱ्या त्यांच्या पँडेमिक मधल्या अनुभवांवर समग्र चिंतन करण्याची संधी मिळेल, जे सीमित प्रश्नांनी प्रतिबंधित नसेल. आम्ही त्यांना विचारलेले प्रश्न:

**१) कोविड-१९ (महामारी) च्या पूर्वी तुमचे जीवन कसे होते आणि आत्ता कसे आहे? आपल्याला बदलांबद्दल सकारात्मक व नकारात्मक काय वाटते??**

**२) या वेळेपासून (महामारीचा काळ) आपण काय ठेवू इच्छिता आणि आपण काय बदलू इच्छिता?**

प्रतिसादांचे विश्लेषण करण्यासाठी प्रवचन विश्लेषण आयोजित केले गेले, ज्यात वारंवार येणाऱ्या विषयांवर खूणचिठ्ठीनियुक्त केली गेली. एमपॉवरने काही पूर्वकल्पना धारणेच्या श्रेणींसह डेटाकडे पहिले, जे प्रतिसादांमध्ये अपेक्षित होते. गुणात्मक डेटाला नवीन कोड परिभाषित करण्याची परवानगी देऊन आगमनात्मक दृष्टिकोनासाठी जागा तयार केली गेली. ट्रेंड्स समजण्यासाठी कोडचे प्रमाण निश्चित केले गेले. खाली दिलेले आलेख आणिशब्दांचे ढग त्यांच्यामुक्त अंत प्रतिसादामध्ये ठराविक विषयांचा उल्लेख करणाऱ्या प्रतिसादकांची संख्या दर्शवते.

## क्षेत्रातील प्रतिबिंब

“हे स्पष्ट आहे की कोविड-१९ महामारी मुळे व त्यानंतरच्या लॉकडाउन मुळे केवळ पितृसत्ता आणि वांशिक अत्याचारांमुळे अस्तित्वात असलेल्या असमानता अधिकच तीव्र झाल्या आहेत. कोविड पूर्वीचा काळ किंवा वेळ मोहक असल्याचे भासवून देण्याचे भाष्य केले जाऊ शकते किंवा कोविड पूर्वीच्या काळाला मापदंड किंवा मूलभूत म्हणून पाहिले जाण्याची शक्यता आहे, परंतु असे कोणतेही निष्कर्ष काढण्यापासून मी सावध करू इच्छिते. उदाहरणार्थ, जर फक्त २१% प्रतिसादकांनी कोविड पूर्वीच्या काळात विस्तृत संसाधनांच्या उपलबध्दतेची नोंद केली असेल तर महामारीच्या दरम्यान मुलींसाठी भयानक परिस्थिती आणखी बिकट होईल.”


**डॉ. रमातू बांगुरा**
कार्यकारीसंचालक, चाईल्ड राईट्स इनोव्हेशन फंड

“यापूर्वी मुलींना "नेहमीच्या समस्यांचा" सामना करण्याची सवय होती पण कोविडने काही “नवीन समस्या” निर्माण केल्या ज्या मुलींनादेखील ठाऊक नव्हत्या. मला खात्री नाही की मागील दिवस [प्रत्यक्षात] चांगले होते की आम्ही फक्त त्या मुद्द्यांकडे डोळेझाक केली आहे कारण आम्हाला त्यांची सवय झालेली आहे."

**सीमा दोसड**
वय २०, एमपॉवर गर्ल्स ॲडव्हायझरी कौन्सिल मेंबर


## माझे आयुष्य आधी कसे होते व माझे आयुष्य आता कसे आहे?

### कोविड-19 पूर्वी






## कोविड दरम्यानची आव्हाने










## सकारात्मक प्रभाव






## आम्हाला गेल्या १२ महिन्यातून काय गोष्टी ठेवायच्या आहेत?

- 32 मुलींना ऑनलाइन आणि त्यांच्या फोनद्वारे शिकणे सुरू ठेवायचे आहे जेणेकरून ते घरून आपले शिक्षण सुरू ठेवू शकतील.
- ऑनलाइन शिक्षणाचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी. 14 मुलींना त्यांचे डिजिटल प्लॅटफॉर्मवरचे प्रशिक्षण सुरू ठेवायचे आहे
- 3 मुलींना पाहिजे की सरकारने मुलींच्या कुटुंबांवरील आर्थिक ओझे कमी करण्यासाठी लग्नाच्या पाहुण्यांची संख्या कायमस्वरूपी मर्यादित करणे सुरू ठेवावे.
- आमचे मित्र, जे कठीण काळात आमच्या बाजूने उभे असतात. 14 मुलींना त्यांचे ते मित्रमैत्रिणी जवळ ठेवायचे आहेत, जे कठीण काळात त्यांच्या बाजूने उभे राहिले होते.
- लॉकडाउन दरम्यान आधार देणाऱ्या कुटुंबातील सदस्यांसह झालेली जवळीकता. ३२ मुली त्यांच्या कुटुंबातील सदस्यांशी जोडल्या गेल्या आणि त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून आधार वाटला.
- 13 मुलींनी स्वयंसेवी संस्थांकडून (एन जी ओ) मिळालेला पाठिंबा आणि मार्गदर्शनाचा उल्लेख केला ज्यांनी त्यांना मास्क्स, जंतुनाशक द्रव्य आणि हात धुण्यासाठी सुविधा पुरवल्यात. कोविड -19 सारख्या परिस्थितीत समर्थन व मार्गदर्शन करतात.
- 10 मुलींना आनंद, सकारात्मकता व कोविड -19 सारख्या परिस्थितीशी सामोरे जाण्याची आशा पुढे चालू ठेवायची आहे.
- 12 मुलींनी त्यांच्या स्वच्छ, प्रदूषणमुक्त आणि रोग मुक्त परिसराचा आनंद घेतला कारण लोक घरी राहत असल्यामुळे वाहनांची रहदारी नव्हती

## कार्यकर्त्यांचे विचार

"हे पाहून आम्हाला आनंद झाला की लोकं त्यांच्या कुटूंबियांसोबत वेळ घालवत आहेत, परंतु अजूनही अशा मुली आणि स्त्रियांचे मोठे प्रमाण आहे ज्यांना स्वत:च्या घरात सुरक्षित वाटत नाही."
– **काजल सिंह**, वय २२, एमपॉवर गर्ल्स ऍडव्हायझरी कौन्सिल सदस्य



# शाश्वत विकास ध्येये (एसडीजी) यांच्या सह छेदनबिंदू

पुढील पानांमध्ये आम्ही आमचे निष्कर्ष एसडीजी अंतर्गत विषयासंबंधित संकलित करतो. प्रत्येक विभागात आम्ही माहितीचे तीन स्त्रोत उद्धरण करतो: प्रतिसादक, मुली नेत्या आणि व्यवसायी (शिक्षणतज्ज्ञ, संशोधक व समवयस्क जे किशोरवयीन मुलींसह काम करतात तसेच आमच्या मुली सल्लागार समितीच्या मुली).

1) आम्ही समाविष्ट केलेल्या 153 प्रतिसादकांकडून: हो/नाही उत्तर वाल्या प्रश्नावली मधून मिळालेला डेटा शीर्षक:

### कार्यक्षेत्रामधील डेटा

डेटा संच उत्कृष्ट होण्यासाठी मुली प्रतिसादकर्त्यांकडून घेतलेली विशेष माहिती, शीर्षक:

### कार्यक्षेत्रामधून घेतलेला आवाज

महामारी नंतरच्या नियोजनासाठी मुलींकडून घेतलेल्या शिफारसी, शीर्षक:

### कार्यक्षेत्रामधून सल्ला

2) आम्ही समाविष्ट केलेल्या मुली नेत्यांकडून:

त्यांच्या कार्यक्षेत्रातील नोंद पुस्तिकेतले आणि डेटा विश्लेषण मास्टर क्लासेसमधले चिंतन, शीर्षक:

### लीडर लॅबचे प्रतिबिंब

3) व्यवसायींकडून (प्रॅक्टिशनर्स) आम्ही समाविष्ट केले ते म्हणजे:
किशोरवयीन मुलींसह काम केलेला डेटा आणि त्यांच्या अनुभवातून केलेले चिंतन, शीर्षक:

### व्यवसायींकडून (प्रॅक्टिशनर्सकडून) मिळालेले प्रतिबिंब




## एसडीजी 5
## लिंग समानता

## एसडीजी 10
## घटलेली असमानता

कोविड-१९ ने अस्तित्वात असलेली असमानता तीव्रतेने वाढविली आहे. किशोरवयीन मुली व तरूण स्त्रियांसाठी, पुरुषत्व आणि लिंगभेदाचे परिणाम तीव्र केले. लॉकडाउन मुळे बिनपगारी काळजी घेण्याच्या कामांच प्रमाण वाढलं, अल्पवयीन विवाह, बहिष्कार, दुर्लक्षपणा व परस्पर समर्थन आणि एकता यासाठी असलेल्या मोकळ्या जागा बंद झाल्या.

## कार्यक्षेत्रामधील डेटा

**80%** ·लॉकडाउन दरम्यान प्रत्येक सदस्य घरी असूनही, 80% मुलींनी सांगितले की घरगुती कामे ही अजूनही त्यांचीच जबाबदारी असते.




**71%** प्रतिसादकांनी प्रामुख्याने इतर महिला नातेवाईकांकडून मदत मिळाल्याची नोंद केली.

**9%** केवळ 9% पुरुष नातेवाईक घरातील कामांमध्ये मदत करतात.

**29%** प्रतिसादकांचा असा विचार आहे की मुलींची जात, वर्ग किंवा अपंगत्व अपवर्जनात भूमिका निभावते.

ज्यांचा यावर विश्वास आहे त्यापैकी:




**41%** ओबीसी म्हणून ओळखले जातात

हिन्दू
मुस्लिम

सर्व मुस्लिम प्रतिसादकर्त्यांपैकी 35% लोक यावर विश्वास ठेवतात आणि फक्त 15% हिंदू प्रतिसादकांचा असा विश्वास आहे.

**16%** लखनौचे आहेत


**34%** मुंबईचे आहेत

**18%** पुण्याचे आहेत



**42%** मुलींचा असा विश्वास आहे की कोविड-19 मुळे लग्नाचा दबाव वाढला आहे.

लग्नाचा दबाव वाढला आहे असा विश्वास असणाऱ्या प्रतिसादकांपैकी:




**56%** एसटी / एससी / ओबीसी म्हणून ओळखले जाणारे होते

हिन्दू
मुस्लिम

38% मुस्लिम म्हणून ओळखले जाणारे होते आणि 56% हिंदू म्हणून

**30%** मुंबईचे होते

**18%** पुण्याचे होते



## कार्यक्षेत्रातील आवाज

### वाढलेली कामे

"मला माझ्या आईबरोबर स्वयंपाकघरात काम करावे लागते कारण प्रत्येकाला नेहमी काहीतरी खायचे असते."'
-वय 18, अल्वार

"लॉकडाउन होण्यापूर्वी मला फक्त संध्याकाळी माझ्या आईला मदत करावी लागायची परंतु आता बहुतेक वेळा मी तिच्याबरोबर काम करणे अपेक्षित असतं."
-वय २२, पुणे

### निर्बंध

"मला तेच करावे लागते जे माझ्याकडून अपेक्षित आहे. जर मी गॅलरीत जाऊन माझ्या मित्रांसह बोलण्यासाठी उभी राहिले तर माझे पालक मला विचारतात:

तू बाहेर का उभी आहेस आणि मोठ्याने का बोलत आहेस?? शेजारी काय विचार करतील? अशी कशी मुलगी आहेस तू? ....मी जेव्हा काहीतरी चांगले करण्याचा प्रयत्न करते तेव्हा ते वाईट मानले जाते."
-वय 16, पुणे

"मला जीन्स आणि अर्धी चड्डी (हाफ पॅन्ट) घालण्याचीदेखील परवानगी नाही जी मला घालायला आवडते. माझे आयुष्य आता चांगले नाही."
-वय 16, पुणे

"आम्हाला आमचे सण साजरे करण्याची परवानगी नव्हती, परंतु इतर लोकांनी तसं केलं. माझा भाऊ खरेदी साठी गेला होता पण मला कोणीही बाजारातजाण्यासाठी विचारले नाही."
-वय १४, लखनौ

### उपेक्षित मुलींसाठी अधिक अडथळे

"लॉकडाउन मुळे मी यावर्षी माझ्या पालकांवर अधिक अवलंबून आहे."
-अपंगअसलेली तरुण स्त्री, वय 22,अहमदाबाद

"माझ्या अपंगत्वामुळे माझी हालचाल मर्यादित होते आणि आई मला कधीकधी बाहेर नेत असे. लॉकडाउन दरम्यान मी घरातच कोंडले गेले."
-अपंग असलेली मुलगी, वय १४, मुंबई

"मी स्थलांतर केले आहे व आता मी माझ्या बहिणी आणि तिच्या कुटुंबासहराहात आहे. माझ्या मताला घरात काहीच महत्व नाही आणि नेहमीच मी एक ओझे आहे असं दर्शवून दिलं जातं."
-घटस्फोटित तरुण स्त्री, वय १८, अहमदाबाद

"मला मानसिक आरोग्य समस्या आहेत आणि कोविड-१९ लॉकडाउन दरम्यान माझ्या समस्या तीव्र झाल्या. माझे पालक मला मदत करण्याचा प्रयत्न करतात, परंतु ते ही निराश आहेत."
-वय १९, मुंबई

"मी वडील गमावल्यानंतर माझ्या कुटुंबातील सदस्य माझ्याशी व माझ्याआईशी भेदभाव करू लागले. ते अंधश्रद्धाळू असल्यामुळे त्यांनी आम्हाला सण आणि रितीरिवाजांमधून वगळले."
-वय १८, मुंबई



## लीडर लॅबचे प्रतिबिंब

कोविड-१९ ने मुलींवर अतिरिक्त निर्बंध आणले आहेत जे व्यापक पुराणकथा व अफवा, चुकीची माहिती व गोंधळामुळे आणखी तीव्र झाले आहे असे नेत्यांनी ठळकपणे सांगितले. बऱ्याच मुलींकडे फोन नसल्यामुळे व त्यांच्या मैत्रीणींना भेटू शकत नसल्यामुळे ते प्रौढ किंवा कुटुंबातील इतर सदस्यांवर अधिक अवलंबून होते."सामान्यत: मुलींना मिळालेले स्वातंत्र्य कायम मर्यादित असतं. परंतु लॉकडाउन मध्ये प्रत्येकजण घरी अडकल्यामुळे, कुटुंबातील सदस्य सतत त्यांच्या (मुलींच्या) प्रत्येक हालचालीवर टीका करून त्यांचे स्वातंत्र्य कमी करतात."

**-रोशनी**
लीडर लॅब, लखनौ



## कार्यक्षेत्रामधून घेतलेला सल्ला

जगाला दिलेला सल्ला ज्याला मुली नेत्यांनी प्राधान्य दिले आहे त्याचे खाली ठळकपणे वर्णन केले आहे;

### समुदायांसह

लैंगिक समानतेबद्दल माहितीवर आधारलेले दृष्टीकोन विकसित करा जे मुलींना, त्याच्या निर्णयांना व त्यांच्या पसंतीला महत्त्व देतात.

पारंपारिक व जुन्या विचारांचे नियम व स्त्रिया आणि मुलींशी भेदभाव करणाऱ्या पद्धती बदला.

### मुलींसह

मूळ जीवन कौशल्यांवर मुलींची व तरुण महिलांची क्षमता वाढवा.

मुली व युवतींना त्यांचे हक्क आणि स्वातंत्र्य जाणून घेण्यासाठी व त्यांचा उपयोग करण्यासाठी लागणारा दृष्टिकोन तयार करण्यात गुंतवणूक करा.

## क्षेत्रातील प्रतिबिंब

"मुलींच्या आयुष्यात वाढलेली दुर्लक्षिता आणि [कमी झालेले] स्वातंत्र्य चिंताजनक आहे पण दुर्दैवाने यात काही आश्चर्य नाही. स्वत: ची काळजी घेण्यासाठी घालविलेला कमी वेळ देखील आश्चर्यजनक नाही व मुली आणि तरुण स्त्रियांना पाठिंबा देण्याची गरज पुष्टी करते, त्यांना विश्रांती साठी आणि आघातजन्य अनुभवांमधून पुढे जाण्यासाठी जागा व वेळ देते."

**- रुबी जॉनसन**
लिंग न्याय सल्लागार / मुली व महिलांच्या हक्कांबद्दलची विशेषज्ञ

## एस.डी.जी 3

# चांगले आरोग्य व स्वास्थ्य

## कार्यक्षेत्रामधील डेटा

### मानसिक आरोग्य

कोविड-१९ च्या आसपासचे प्रबळ भाषण हे त्याला शारीरिक आरोग्यासाठी असलेला धोका असे दर्शविते. तथापि, याने मानसिक आरोग्यावर होणारा परिणामदेखील जाहीर केला आहे, विशेषत: मुलींवर प्रतिसादकर्त्यांनी अनेक जटिल आव्हाने व चिंतेचे वर्णन केले आहे - सामाजिक अलगीकरण व पालकांच्या मानसिकतेपासून ते अनिश्चिततेपर्यंत - ज्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर आणि त्यांच्या भावना व्यवस्थापित करण्याच्या क्षमतेवर परिणाम झाला.

**90%** नव्वद टक्के मुलींनी मानसिक त्रास व निराशेचा सामना केला आहे, यासह: औदासिन्य, प्रदीर्घ झालेले दु:ख, आत्मविश्वासाचा अभाव, एकटेपणा आणि असहायता.

**जवळजवळ अर्ध्या प्रतिसादकांनी नकारात्मक विचार नोंदवले** आणि अन्यथा आनंददेणारी उपक्रम करण्याचीप्रेरणा कमी झाल्याचेनोंदविले आहे.

## कार्यक्षेत्रातील आवाज

“मला निराशाजनक आणि असहाय्य वाटतं, मला काहीही करण्याची इच्छा होत नाही. मी यापूर्वी कधीही नव्हते अश्या काळजीत आता असते व सतत घाबरलेली असते.”
-वय 16, मुंबई


“माझे शिक्षणपूर्णपणे थांबले आहे. माझ्या वडिलांची नोकरीगेली आणि अलीकडेत्यांनी काही कामंघेतली परंतु त्यातूनपुरेसे पैसे मिळतनाहीत. जीवनाचा सामनाकसा करावा हेमला समजत नाहीये.”
- वय 17, दिल्ली

“मी कुटुंबातील दोन सदस्यगमावले आणि मलाशेवटची श्रद्धांजली सुद्धा देताआली नाही. मलासतत निराशाजनक वपराभूत झाल्यासारखं वाटतं.”
-वय 18, लखनौ

“मी सततचिंताग्रस्त असते वमला माझ्या भविष्याबद्दल भीती वाटते. घरगुती कामे करण्याचादबाव वाढलेला आहेव माझे पालकमला नेहमीच फटकारतअसतात. मीशाळा सोडल्यापासून माझ्यामित्रमैत्रिणींना भेटू शकतनाही.”
- वय १५, पुणे








## लीडर लॅबचे प्रतिबिंब

त्यांच्यापैकी कोणाकडे ही (या आव्हानांशी) झुंझण्याची यंत्रणा पद्धती बद्दल कोणतीही माहिती नव्हती, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांऐवजी त्यांच्या मैत्रिणींशी किंवा शिक्षकांशी बोलण्याची इच्छा व्यक्त करण्याशिवाय. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी कोविड-१९ पासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी साधी पावले / खबरदारी कशी घ्यावी ते सांगितले त्याप्रमाणे मानसिक आरोग्यासाठी साधने तयार करण्याच्या महत्त्वावर मुली नेत्यांनी जोर दिला. एका मुली नेत्याने सांगितले की, “मुलींना बरे वाटण्यासाठी मैत्रिणींशी किंवा शिक्षकांशी त्यांच्या समस्यांबद्दल बोलण्याची गरज आहे. घरी पालक टोचून बोलतात आणि त्यांना दोष देतात. परंतु, जेव्हा कोणी त्यांच्या समस्या ऐकुन घेतात तेव्हा त्यांना बरे वाटते.” नेत्यांनी असेही नमूद केले की मुली शाळा किंवा महाविद्यालयात जात नसल्यामुळे त्यांचा त्यांच्या समवयस्कांशी असलेला संपर्क तुटला. नियमित शाळा व महाविद्यालयीन दिनचर्या आणि मैत्रिणींशी व विश्वासू प्रौढांशी संपर्क साधणे ही एक विशिष्ट झुंझण्याची यंत्रणा आहे जी व्यक्तींना मानसिक आरोग्याच्या आव्हानांचा सामना करण्यास मदत करते.

## आशेवर एक प्रकाशझोत (स्पॉटलाईट)

केवळ 26% प्रतिसादकांनी सकारात्मक, आनंदी, समाधानी, आशावादी, सुरक्षित, आशाजनक आणि भविष्याबद्दल कमी ताणतणाव वाटण्याची नोंद केली.

“मी चित्रकला सुरू केली. यातून मला आनंद मिळतो.
- वय 16, बरेली

“शाळा सुरू झाल्यावर मला काय करायचे आहे याबद्दल मी लिहिते. हे मला प्रेरित करते.”
-वय 17, पुणे


“माझ्या बहिणीने मला नवीन गोष्टी शिकण्यास मदत केली आणि माझ्या भावाने मला नवीन पदार्थ तयार करण्यास मदत केली.”
– वय 18, अलवार

“मी माझ्या आईवडील व भावंडांसोबत उत्तम वेळ घालवला.”
– वय 16, लखनौ

## शारीरिक आरोग्य

आजारी असल्याची नोंद असलेल्या तीन प्रतिसादकर्त्यां व्यतिरिक्त, लॉकडाउन मुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यावर काय परिणाम झाला यावर बहुतेकींनी जास्त काही सांगितले नाही.
अनेकांनी त्यांच्या आरोग्य सेवा आणि माहिती मध्ये होणारा व्यत्यय तसेच आरोग्य सेवांच्या अकार्यक्षमतेचे वर्णन केले.

**53%** कोविड-१९ व लॉकडाउन दरम्यान ज्या प्रतिसादकांना डॉक्टरांना भेट देण्याची गरज होती त्यांच्यापैकी 53% लोकांनी नोंदवले की त्यांना जेव्हा आवश्यक होते तेव्हा ते भेट देऊ शकले नाही.




**14%** यांनी नमूद केले की त्यांना सतत कोविड-19 होण्याची भीती वाटत होती.

**11%** लोकांचा असा विश्वास आहे की सामाजिक अंतरामुळे लॉकडाउन दरम्यान जाती-आधारित हिंसा आणि जातीय दंगलीसारख्या भेदभावाची वाढ झाली आहे.

> “पूर्वी, आम्ही जवळच्या सरकारी रुग्णालयात जायचो. पण लॉकडाउनने हे रोखले. तसेच खासगी रुग्णालये महागडी असल्याने ते आवाक्याबाहेर होते.” -वय 22, दिल्ली

**आपण कोविड-१९ बद्दलची (माहिती) शोधण्यासाठी कोठे जाता?**




**95%** लोकांना मास्क आणि जंतुनाशक द्रव्य उपलब्ध होते.

> “स्वयंसेवी संस्थांकडून महिलांसाठी अन्न, फेसमास्क व स्वच्छता उत्पादने मिळाल्याने मोठा दिलासा मिळाला.” -वय 18, दिल्ली

33% लोकांचा असा विश्वास आहे की ते शारीरिक अंतर राखू शकत नाहीत.

## लीडर लॅबचे प्रतिबिंब


मुलींनी नोंदवले की मास्क, जंतुनाशक द्रव्य व वारंवार हात धुण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्यात स्वयंसेवी संस्थांची मोठी भूमिका होती. त्यांनी सहमती दर्शविली की नागरी संस्थेने हस्तक्षेप केला नसता विशेषत: पहिल्या लॉकडाउन दरम्यान तर त्यांना ही आवश्यक उत्पादने उपलब्ध झाली नसती.

3 GOOD HEALTH AND WELL-BEING

## मासिक पाळीचे आरोग्य व्यवस्थापन

**96%** प्रतिसादकांना मासिक पाळी येत होती आणि 4% नाही.

सध्या ज्या मुलींना मासिक पाळी येते त्यापैकी:




**27%** ज्यांना मासिक पाळी येत होती त्यांच्यापैकी 27% लोकांनी नोंदवले की कोविड-१९ मुळे सॅनिटरी उत्पादनाच्या उपलब्धतेवर परिणाम झाला.

## कार्यक्षेत्रामधून घेतलेला सल्ला

जगाला सल्ला म्हणून ज्याला मुली नेत्यांनीप्राधान्य दिले आहे त्याचे ठळकपणे वर्णन केले आहे;

### मानसिक आरोग्य

औदासिन्यता व तणावाला सामोरे जाण्यासाठी मुली व तरुण स्त्रियांचे समुपदेशन करण्यासाठी गुंतवणूक करा.

कुटुंबात मजबूत समर्थन आणि प्रतिसाद यंत्रणा तयार करण्यासाठी कुटुंबांसह कार्य करा.

### मासिक पाळी

आर्थिकदृष्ट्या सॅनिटरी पॅड अधिक प्रमाणात उपलब्ध आणि परवडणारे करा.

मासिक पाळीच्या बाबतीतली लाज व कलंक कमी करा.

### आरोग्य सुविधा आणि उपलब्धता

उच्च गुणवत्तेच्या आरोग्य सुविधांची उपलब्धता सुधारित करा व तिमाही शरीर तपासणी आणि औषधांचा पुरवठा करा.

## लीडर लॅबचे प्रतिबिंब

- मुली नेत्यांनी सांगितले की लॉकडाउन मुळे सुरुवातीला सॅनिटरी उत्पादनांची कमतरता निर्माण झाली कारण शाळा बंद होती, मोजकीच दुकानं उघडी होती व मुली सहजपणे घरा बाहेर पडू शकत नव्हत्या. तथापि, स्वयंसेवी संस्थांनी त्यांच्या कोविड-१९ मदतकार्याचा एक भाग म्हणून ही उत्पादने उपलब्ध करून देण्यात मोलाची भूमिका बजावली.
- मुली नेत्यांनी असेही नमूद केले की काही प्रतिसादकांनी मासिक पाळीवर चर्चा करण्यास संकोच व्यक्त केला व या विशिष्ट प्रश्नांची उत्तरे टाळण्याचा ही प्रयत्न केला.

# एस डी जी 4

## उच्च गुणवतेचं शिक्षण

शिक्षण हा असा मुद्दा होता ज्याबद्दल मुली सर्वात जास्त बोलल्या, दोन्ही दृष्टिकोनातून म्हणजेच कोविड-१९ मुळे सर्वात जास्त काय परिणाम झाला आणि कोविड नंतरच्या पुनर्बांधणी बद्दल आपण काय केले पाहीजे या बद्दलचा विचार देखील.

## कार्यक्षेत्रामधील डेटा

**70%** प्रतिसादक सध्या शाळा / महाविद्यालयात आहेत



**85%** ऑनलाइन शाळेत उपस्थित राहतात.

**28%** नागरी संस्थेच्या सहकार्याने उपस्थित राहतात.

**23%** समुदाय आधारित वर्गाद्वारे उपस्थित राहतात.

**52%** ज्या मुलींकडे साधने आहेत त्यांच्यापैकी 52% महानगरातून (मेट्रो शहरातून) आहेत.

**30%** प्रतिसादक नाहीत.




**37%** यांनी घरगुती कामामुळे (शाळा) सोडली.

**31%** यांनी (शाळा) सोडली कारण त्यांच्याशाळा कोविड-19 मुळे बंद झाल्या.

**24%** यांनी (शाळा) सोडली कारण त्यांना शाळा आवडेनाशी झाली.

**18%** कोविड-19 मुळे शाळा सोडण्याचे प्रमाण 18% होतं.

**13** शाळेत नसलेल्या मुलींपैकी १३ मुली शाळेत जाण्याच्या वयाच्या आहेत.




वयानुसार शाळेत न जाणाऱ्या मुलींची संख्या



"शिक्षण हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. कोविडच्या दरम्यान, वर्ग ऑनलाइन होऊ लागले. मला वाटत नाही की ऑनलाइन वर्ग प्रत्येकापर्यंत पोहोचू शकले असतील. बऱ्याच विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन किंवा लॅपटॉप नसतात; ज्यामुळे ऑनलाइन शिक्षण मिळण्यापासून ते पूर्णपणे वगळले जातात. त्यांचा अभ्यास सुरू ठेवण्यासाठी आणि स्वत:साठी चांगले भविष्य घडविण्याची संसाधने त्यांच्याकडे नाहीत."
-वय 20, अल्वार

4 QUALITY EDUCATION

**72%** ऑनलाइन शाळेत उपस्थित असणाऱ्या ७२% मुलींकडे ऑनलाइन शिक्षण घेण्याची साधने उपलब्ध आहेत


**33%** लोकांकडे इंटरनेट उपलब्ध आहे.

**13%** लोकांना त्यांच्याफोनवर इंटरनेट उपलब्ध आहे.

**53%** लोकांकडे संगणक उपलब्ध आहे.

34% यांना ऑनलाइन शिक्षण सोपे वाटते.

66% यांना हे (ऑनलाइन शिक्षण) अवघड वाटते.




**28%** यांच्याकडे आवश्यक साधने नाहीत.

**79%** म्हणतात की हे त्यांच्या आर्थिक परिस्थिती मुळे आहे.

**10%** असे म्हणतात की त्यांची शाळा ऑनलाइन शिक्षण देत नाही.

**28%** असे म्हणतात की एकापेक्षाजास्त भावंडांना त्या साधनांची आवश्यकता असते.



**64%** मुली आणि युवती म्हणाल्या की त्यांच्याकडे जागा नाही किंवा ऑनलाइन अभ्यास करण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही.

## कार्यक्षेत्रामधील आवाज

### शाळेत जाण्याची मुभा असणे

"मला माझ्या वर्गाची, माझ्या मित्रमैत्रिणींची आठवण येते. आमच्या शाळेत बरीच संसाधने होती."
- वय 17, पुणे

"माझ्या कुटुंबाला यापुढे शाळेसाठी पैसे भरणं अशक्य झाले."
- वय 17, पुणे

"मी फी भरू शकत नसल्यामुळे मला महाविद्यालयाचं शिक्षण सोडावं लागलं."
- वय 20, अहमदाबाद

### दूरस्थ शिक्षण (रिमोट लर्निंग)

"वर्ग आता वेगळ्या पद्धती चे आहेत. (ते) कसे शिकायचे ते मला माहित नाही."
- वय 16, दिल्ली

"मला ऑनलाइन धडे समजत नाही आणि माझ्या शंका दूर करण्यासाठी मी शिक्षक आणि वर्गातल्या मित्रमैत्रिणींशी बोलू शकत नाही."
- वय 17 अहमदाबाद

"माझ्याकडे ऑनलाइन वर्गात हजर राहण्यासाठी कोणतीही साधने नाहीत. त्यामुळे माझं कॉलेज (महाविद्यालय) चुकतंय."
- वय 20, अल्वार

"लॅपटॉप कसा वापरायचा किंवा गृहपाठ आणि वर्ग कसे ऑनलाइन पूर्ण करायचे हे मला येत नाही."
- वय 19, दिल्ली

### इतर अडथळे

"घरी शिकणे आणि अभ्यास करणे खूप कठीण आहे. जेव्हा मी महाविद्यालयात जात असे तेव्हा मला इतर संसाधनांना नियमितपणे वापरायची संधी आणि वेळ असायचा. जेव्हा प्रत्येकजण घरी असतो तेव्हा खूप आवाज असतो आणि मी लक्ष केंद्रित करू शकत नाही."
- वय 23, पुणे

"पूर्णकरण्यासाठी भरपूर काम आणि अभ्यासक्रम असतो. मला कुटूंबाकडून कोणतीही मदत किंवा पाठिंबा मिळत नाही."
-वय 17, मुंबई

4 QUALITY EDUCATION

# कार्यक्षेत्रातून मिळालेला सल्ला

जगाला सल्ला म्हणून ज्याला मुली नेत्यांनी प्राधान्य दिले आहे त्याचे ठळकपणे वर्णन केले आहे;

## आर्थिक सहाय्य

·इयत्ता ८वी च्या पलीकडे असलेल्या मुलींसाठी विनामूल्य, दर्जेदार शिक्षण द्या.

उच्च शिक्षणाला पाठिंबा द्या, शाळेचं पुन्हा एकत्रीकरण करण्यासाठी व ती चालू ठेवण्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करा.

माध्यमिक शाळेत असलेल्या सर्व मुलींसाठी मध्यान्ह भोजनाची (मिड-डे-मिल) व्यवस्था करा.

पुस्तके, अभ्यासासाठी मोकळी जागा, वाहतूक आणि समुदाय स्तरीय ग्रंथालयांमध्ये गुंतवणूक करा.

ज्या मुलींना काम करावे लागते आहे त्यांच्यासाठी शैक्षणिक संधी वाढवा.

## सुरक्षित शाळा

सुरक्षित जागा तयार करा आणि शाळांमधील लैंगिक व जाती आधारित भेदभाव कमी करा.

मुलींच्या शाळांसह शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करा.

विनामूल्य आत्म संरक्षण प्रशिक्षण सादर करा.

## डिजिटल उपलब्धता

·शिक्षणासाठी डिजिटल उपलब्धता आधुनिक करा.

महामारी च्या नंतर देखील मिश्रित शिक्षण पर्यायांमध्ये गुंतवणूक करा.

## मार्गदर्शन (मेंटोरशिप)

मुलींच्या आणि तरुण स्त्रियांच्या मार्गदर्शनासाठी कार्यक्रम तयार करा.

> “मुली, त्यांचे पालक आणि समुदायाला शालेय शिक्षण व माध्यमिक शिक्षणापासून मिळणारे उत्पन्न समजून घेण्यास मदत करणे महत्वाचे आहे. मुलींना गृहपाठ आणि शैक्षणिक सहाय्य मिळण्यासाठी मदत करणारे कार्यक्रम शैक्षणिक अपयशाच्या परिणामामुळे मुली शाळा सोडणार नाहीत याची खात्री करण्यासाठी आवश्यक आहेत.”- दिपा नाग चौधरी, कार्यक्रम संचालक, पॉप्युलेशन फाउंडेशन ऑफ इंडिया

# लीडर लॅबचे प्रतिबिंब

मुली नेत्यांनी नमूद केले की बऱ्याच प्रतिसादक कर्त्यांकडे डिजिटल शाळेत उपस्थित राहण्यासाठी संसाधने किंवा उपकरणे नव्हती. प्रतिसादक कर्त्यांनी अभ्यास सुरू ठेवण्यात अडचण व्यक्त केली. त्यांनी असा युक्तिवादकेला की आभासी जागा (सेटिंग्ज) वास्तविक वर्गाची भरपाई करू शकत नाही. आता त्यांची समोरासमोर चर्चा होऊ शकत नाही, समस्या सोडविण्यासाठी ते त्यांच्या शिक्षकांशी संवाद साधू शकत नाही किंवा वर्ग मित्रमैत्रिणींकडून पाठिंबा व सहानुभूती मिळवू शकत नाही. तसेच ऑनलाइन शिक्षणाचे फायदे सुद्धा आहेत कारण ज्या मुलींना त्यांच्या कुटुंबियांनी शाळेचे शिक्षण अर्धवट सोडायला लावले होते त्यांना आता अभ्यास सुरू ठेवण्याची संधी मिळाली आहे.

## एस.डी.जी 8

# योग्य काम आणि आर्थिक वाढ

संकटाचे परिणाम नेहमीच लैंगिक असतात आणि कोविड-19 अपवाद नाही. उद्रेकामुळे कुटुंबांवर होणाऱ्या आर्थिक तणावाचा थेट परिणाम मुलींच्या भविष्यातील संधींवर होतो.

## कार्यक्षेत्रामधील डेटा

### कोविड-19 मुळे

**82%** प्रतिसादकांची अशी इच्छा आहे की ते करियर सल्ला आणि रोजगाराच्या सल्ल्यासाठी एखाद्याकडे जाऊ शकतात.


**59%** प्रतिसादकांनी नोंदवले की कोविड-१९ ने त्यांच्या उत्पन्नावर वैयक्तिक किंवा कौटुंबिक पातळी वर परिणाम केला आहे.

**28%** प्रतिसादकांनी सांगितले की कोविड-१९ मुळे त्यांना कौशल्य प्रशिक्षण थांबवावे लागेल

**13%** ·प्रतिसादकांनी कोविड-१९ दरम्यान नोकरी किंवा घर आधारित कामे गमावल्याची नोंद केली.

### महामारीच्या (पँडेमिकच्या) आधी

**34%** ·उत्पन्न निर्मितीच्या कामात गुंतलेले प्रतिसादक १५-१९ वयोगटातील होते.




**58%** एस सी / एस टी / ओ बी सी म्हणून ओळखले जातात.



## लीडर लॅबचे प्रतिबिंब

- मुली नेत्यांनी नमूद केले की लॉकडाउन दरम्यान प्रतिसादकांना पैसा मर्यादित होता. यापूर्वी त्यांना नातेवाईक किंवा पालकांकडून रोख भेटवस्तू मिळायची, परंतु आता नाही मिळत.
- प्रतिसादक कर्त्यांनी नवीन फोन खरेदी करण्याच्या अतिरिक्त खर्चाचा उल्लेख केला, परिणामी आर्थिक भार वाढला आणि कर्जात भर झाली.
- प्रतिसादक कर्त्यांनी घरातील प्रत्येकासह घरगुती खर्च वाढल्याचीनोंद केली.
- “जर मुलींना काही विकत घ्यायचे असेल तर त्यांनी कुटुंबातील प्रत्येक सदस्याला विचारणे आवश्यक आहे. परंतु कुटुंबातील कोणताही इतर सदस्य खरेदी करतो तेव्हा कोणतेही प्रश्न विचारले जात नाहीत.”- नेत्रावती (१९, मुंबई)

## कार्यक्षेत्रामधले आवाज

### उत्पन्नातील तोटा

"मी माझी नोकरी गमावली आणि माझ्या गरजा आणि माझ्या कुटुंबाचे समर्थन करण्यासाठी माझ्याकडे कोणतेही उत्पन्न नाही आहे."
-वय 22, अहमदाबाद

"माझ्या बहिणीला आणि मला शाळा सोडावी लागली कारण आमच्या वडिलांची नोकरी गेली."
- वय 17, दिल्ली

### सोयीसुविधा न परवडणे

"आम्ही आमचं घरभाडं, बिलं भरू शकलो नाही. ती खूप कठीण वेळ होती."
-वय 24, मुंबई

"आम्हाला बराच काळ रेशन खरेदी करता आले नाही. यामुळे आमच्या कुटुंबात खूप त्रास आणि भांडणे झाली."
-वय २०, लखनौ

"पूर्वी आमच्याकडे जगण्यासाठी पुरेसे पैसे होते परंतु आता आमच्याकडे कोणतीही बचत शिल्लक राहिली नाही. आमच्याकडे दररोजच्या वापराच्या वस्तू खरेदी करण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत."
- वय १६, बरेली

### कमी झालेली कौशल्य आणि उत्पन्न संधी

"लॉकडाउनमुळे स्थानिक बाजारपेठ बंद राहिली त्यामुळे माझी आई आणि मी उत्पादने विकू शकलो नाही."
-वय 21, दिल्ली

"मी नोकरी साठी अर्ज करीत आहे पण काहीही मिळत नाही. लॉकडाउन मुळे नोकऱ्या नाहीत."
- वय 21, लखनौ

"प्रशिक्षण केंद्र बंद झाले आणि इतर केंद्र खूप महाग आहेत."
- वय 20, पुणे

### कमी झालेला साठा आणि कर्ज

"आमच्याकडे असलेली सर्व बचत संपून गेली."
-वय 17, दिल्ली

"आम्हाला कोणाकडून तरी दोनदा कर्ज घ्यावे लागले."
- वय २०, अल्वार

# आशा (होप)

**82%** प्रतिसादक त्यांच्या करियर संधींबद्दल आशावादी होत्या.

ज्या वयोगटाला सर्वात जास्त आशा वाटली ती म्हणजे १५-१९ वर्षे वयोगटातील

↑ अल्वार (८३%), बरेली (८३%) आणि लखनौ (८८%) मधील मुलींना सरासरी निकालापेक्षा जास्त आशावादी वाटले.
मुस्लिम मुली (८३%) हिंदू मुलींपेक्षा (८१%) सरासरी निकालापेक्षा किंचित जास्त आशावादी होत्या.

↓ दिल्ली (71%), मुंबई (68%), अहमदाबाद (75%) आणि पुणे (44%) या मुलींना सरासरी निकालापेक्षा कमी आशावादी वाटले.
एस टी / एस सी / ओ बी सी म्हणून ओळखल्या गेलेल्या मुली सरासरी निकालापेक्षा (71%) कमी आशावादी होत्या.

**44%** सर्व प्रतिसादकांपैकी 44% प्रतिसादकांनी असे सांगितले की कोविड-१९ दरम्यान त्यांना त्यांच्या अभ्यासावर आणि कामाच्या संभावनांबद्दल कोणीतरी सल्ला द्यायचे

“आज परिस्थिती चांगली नाही पण ती चांगल्यासाठी बदलेल. अशी मला आशा आहे." वय - २४, मुंबई
“पुढची दोन वर्षे कठीण असतील, पण हळूहळू सगळं (सुरळीत) होईल.” वय - २०, मुंबई
“२०२० च्या तुलनेत हे वर्ष अधिक चांगले असेल.” वय - १७, मुंबई

## क्षेत्रातील प्रतिबिंब

**“तथापि, भविष्यासाठी आशा आहे - जर फक्त राज्य आणि समाज या मुली व युवतींचे आवाज ऐकून घेत असले तर.** यातून मिळालेला संदेश स्पष्ट आहे: महिलांच्या आर्थिक संधींची वाढ त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय स्वातंत्र्यासह होणे आवश्यक आहे. हे दोघे परस्पर मजबुतीकरण करीत आहेत आणि भारतीय समाजात परिवर्तनात्मक बदल घडवून आणू शकतात. अलिकडच्या वर्षांत झालेल्या अनेक परावर्तनांपैकी, भारताच्या महिला कामगार दलाच्या सहभागाला उतरती कळा लागली आहे ही गोष्ट चिंताजनक आहे. मुली आणि स्त्रियांनी ध्वजांकित केल्याप्रमाणे तातडीची प्राथमिकता म्हणजे मुली व स्त्रियांसाठी योग्य कामाची संधी निर्माण करणे आणि सुरक्षित व भेदभाव नसणारी कामाची ठिकाणे तयार करणे यासाठी गुंतवणूक करणे. महिला सशक्तीकरण, आर्थिक वाढीस गती देण्यासाठी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अधिक न्याय्य व न्याय्यी समाज बांधण्यासाठी गुंतवणूक आवश्यक आहे.”
**– डॉ. ए.के शिव कुमार**
विकास अर्थशास्त्रज्ञ आणि स्वतंत्र संशोधक

## लीडर लॅबचे प्रतिबिंब

“बऱ्याच कारणांमुळे आशेची भावना निर्माण झाली आहे; पहिले कारण लॉकडाउन दरम्यान गोष्टी इतक्या वाईट होत्या की एकदा काय गोष्टी उघडण्यास सुरुवात झाल्या की लोकांना त्यांच्या भविष्यातील भवितव्याची अधिक आशा वाटू लागली. बरेच सरकारी अधिकारी रेशन वितरीत करीत होते आणि सर्वेक्षण करीत होते जे लोकांनी पूर्वी कधी पाहिले नव्हते तसेच स्वयंसेवी संस्थांमधील लोकं सुद्धा समुदयात दिसू लागले. या सर्वांना पाहून लोकं त्यांच्या स्वत:च्या भविष्याबद्दल आशावादी झाले कारण असे दिसू लागले की जणू लोकं त्यांचं ऐकत आहेत.” प्रीती (२४, दिल्ली).

## जगाला दिलेला सल्ला

त्यांच्या सल्ल्यानुसार, मुली अधिक लवचिक, आर्थिक दृष्ट्या स्वावलंभी आणि सुरक्षित आर्थिक भविष्याची मागणी करीत आहेत. जगाला सल्ला म्हणून ज्याला मुली नेत्यांनी प्राधान्य दिले आहे त्याचे ठळकपणे वर्णन केले आहे;

### प्रशिक्षण

·तांत्रिक, कौशल्य निर्माण व रोजगार प्रशिक्षणात गुंतवणूक करा आणि अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वत:ची कार्यक्षमता आणि नेतृत्व प्रशिक्षण समाविष्ट करा.

जिथे मुली राहतात त्या समुदायांच्या जवळपास प्रशिक्षण केंद्रे तयार करा.

मुलींना घरातून छोट्या प्रमाणावर असलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षित करा.

### नोकरी निर्मिती

**रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करणारी धोरणे आणि कार्यक्रमविकसित करा.**

**मार्केटशी प्रशिक्षण जोडणाऱ्या नोकरीच्या संधी निर्माण करण्यात गुंतवणूक करा.**

**अपंग आणि जे कमी साक्षर आहेत त्यांच्यासाठी नोकरीच्या संधींचा विचार करा.**

### काम करण्याचा अधिकार

महिलांसाठी भेदभाव नसणारी कार्यस्थळे तयार करा.

महिलांच्या (मोबदला व बिन पगारी) कामाचे मूल्य मान्य करा आणि समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करा.

# एस.डी.जी 11

## शाश्वत शहरे आणि समुदाय


एकदा किशोरवयीन झाल्यावर शहरांमधील सार्वजनिक ठिकाणे मुलींसाठी ‘क्षमतेबाहेर’ असतात; एकतर हिंसाचाराच्या धोक्यामुळे किंवा सार्वजनिक जागा वापरणाऱ्या मुलींना ‘सन्माननीय’ असल्याचे समजले जात नाही म्हणून सुद्धा. हा मुद्दा प्रतिसादकांना तीव्रतेने जाणवला जे लैंगिक हिंसाचारा (जीबीव्ही) बद्दल आणि सार्वजनिक ठिकाणांमधल्या प्रवेशाबद्दल विस्तृतपणे बोलले. हिंसा ही सार्वजनिक व खाजगी समस्या असून ती महिला आणि मुलींच्या प्रणालीगत अधीनतेशी संबंधित आहे, आम्ही एसडीजी ११ अंतर्गत लैंगिक हिंसाचारा बद्दल (जीबीव्हीबद्दल) आमचे निष्कर्ष स्पष्ट करणे निवडले आहे, कारण मुलींचा सल्ला शहरांशी, समुदाय, आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित आहे जे या व्यापक सामाजिक रुढीला बदलण्यासाठी काहीतरी करू शकतात.



## कार्यक्षेत्रामधील डेटा

**49%** ने गतिशीलता कमी झाल्याची नोंद केली आणि अधिक अडथळ्यांचा सामना केला.






जरी सर्वांसाठी गतिशीलता प्रतिबंधित होती, तरीही कुटुंबातील पुरुष सदस्यांच्या (५०%) तुलनेत केवळ (१२%) मुली मित्रमैत्रिणींशी खेळायला किंवा भेटायला बाहेर पडल्या.

**26%** प्रतिसादकांचा असा विश्वास आहे की लैंगिक हिंसाचारा मध्ये (जीबीव्हीमध्ये) वाढ झाली आहे.

लैंगिक हिंसाचारा मध्ये (जीबीव्हीमध्ये) वाढ झाली आहे असा विश्वास असलेल्या प्रत्येक शहरातील प्रतिसादक कर्त्यांची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे:




**62%** 38% महानगरातून (मेट्रो शहरातून) आहेत आणि 62% छोट्या शहरांमधून आहेत.

**66%** 15-19 वर्षाच्या मुलींचा बहुधा असा विश्वास होता की लैंगिक हिंसाचारा मध्ये (जीबीव्ही मध्ये) वाढ झाली आहे

**59%** प्रतिसादक एस टी / एस सी / ओ बी सी पार्श्वभूमीचे आहेत.

## मुलींच्या प्रतिसादांमधून घेतलेले उतारे

### गतिशीलता

"मला बाहेर जायचे आहे परंतु मला माहित आहे की ते सुरक्षित नाही आणि माझे कुटुंब मला त्यावर टोचून बोलेल."
-वय 16 लखनौ

"अशा परिस्थितीत बाहेर जाणे किंवा मित्रमैत्रिणींना घरी आमंत्रित करणे शक्य नाही. पूर्वी मी नेहमीच माझ्या जिवलग मित्रमैत्रिणींसह हँग आउट (मन मोकळ्या गप्पा मारण्यासाठी जमणे) करु शकत असे."
- वय 20, अल्वार

मी कोविड-१९ लॉकडाउन नियमांमुळे माझ्या घराजवळील सामुदायिक शौचालयांमध्ये जाऊ शकत नाही.

मी शौचालयात जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला हिंसाचाराचा सामना करावा लागला. घरापासून दूर असलेल्या शौचालयात जाण्यासाठी मला दुसऱ्या समुदायामध्ये जावे लागते.
- वय 20, मुंबई

### हिंसाचार आणि आक्रमकता

"मला खूप मारहाण झाली आणि मला माझ्या कुटुंबाकडून पुरेसे प्रेम मिळाले नाही."
-वय 12 मुंबई

"लॉकडाउन दरम्यान माझे वडील खूप मद्यपान करायचे व माझ्या आईशी भांडायचे. मी खूप घाबरले होते."
-वय 16, मुंबई

### खेळायचा अधिकार

"मला फुटबॉल खेळण्याची आणि माझ्या फुटबॉलच्या सरावाची आठवण येते."
-वय 14, मुंबई

"मी सध्या खेळत नाही कारण मी उद्यानात जाऊ शकत नाही. माझ्या बहिणीने मला घरी खेळण्याचा सल्ला दिला पण इथे खेळायला वेळ किंवा जागा नाही."
- वय 15, पुणे

"महिलांसाठी असलेली समुदायातील व्यायाम शाळा बंद आहे. मी दर आठवड्याला तिथे जायचे. मी सध्या व्यायाम करत नाही. मला माझ्या कुटुंबासमोर (व्यायाम करायला) लाज वाटते."
- वय 22, मुंबई

# कार्यक्षेत्रातून मिळालेला सल्ला

जगाला सल्ला म्हणून ज्याला मुली नेत्यांनी प्राधान्य दिले आहे त्याचे ठळकपणे वर्णन केले आहे;

## पायाभूत सुविधा

पायाभूत सुविधा सुधारित करा, यासह: गृहनिर्माण, स्वच्छ शौचालये, सुरक्षित आणि परवडणारी वाहतूक, पथदिवे, पाणीपुरवठा आणि वीज.

## स्वच्छता

स्वच्छता आणि स्वच्छतेमध्ये गुंतवणूक करा जेणेकरुन मुली आणि स्त्रिया निरोगी आयुष्य जगू शकतील.

हिरवी, स्वच्छ व प्रदूषण मुक्त शहरे तयार करा.

## खेळण्याचाअधिकार

·मुली आणि युवतींना **खेळांमध्ये सहभागास घेण्यास प्रोत्साहन द्या.** क्रीडांगणे आणि उद्याने तयार करण्यासाठी संसाधनांचे वाटप करा.

## सार्वजनिकसुरक्षा आणि गतिशीलता

·शहरातील मुली आणि स्त्रियांसाठी सुरक्षित व हिंसा मुक्त जागा तयार करा.

लैंगिक हिंसाचार (जीबीव्ही) रोखण्यासाठी कायदे व धोरणे तयार करा आणि त्यांची अंमलबजावणी होते याची खात्री करा.

पोलिसांना गुंतवून, गस्त वाढवून आणि दोषींवर कारवाई करून महिला व मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि हिंसाचार रोखण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी यात सुधार आणा.

मुलींची सुरक्षा आणि गतिशीलता वाढविण्यासाठी समुदाय हस्तक्षेपात गुंतवणूक करा, हिंसा किंवा लैंगिक अत्याचाराच्या भीती शिवाय त्यांना संधी आणि संसाधनांचा उपयोग करून घेण्यास सक्षम करा.

दोषारोप समाप्त करण्यासाठी आणि लैंगिक हिंसाचार (जीबीव्ही) दैनंदिन जीवनाचा भाग बनणार नाही याची खात्री करण्यासाठी समुदायातील सदस्यांसह, मुलांबरोबर आणि मुलींसह व्यस्त रहा.

# क्षेत्रातील प्रतिबिंब

"अधिक गुंतवणूकीची आवश्यकता असणारे एक क्षेत्र म्हणजे सामाजिक रूढी बदलणे ज्या महिला, मुली आणि लैंगिक अनुरूप नसलेल्या व्यक्तींसाठी हिंसेला दैनंदिन जीवनाचा भाग बनवतात. पाळत ठेवणे आणि संरक्षणाची संकल्पना बदलून त्या ऐवजी सामर्थ्य (एजन्सी )आणि मुलींचे हक्क सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे की महिलांच्या गतिशीलतेवर आणि सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यावर हिंसाचाराचा धोका यापुढे अंकुश ठेवण्याचे कारण बनू नये.
मुख्य म्हणजे बदल घडवून आणणाऱ्या समुदायातील मुली आणि युवतींमध्ये गुंतवणूक करणे, कारण त्यांना त्यांच्या हिंसाचार आणि भेदभावाच्या अनुभवांबद्दल उत्तम प्रकारे माहिती आहे. काय बदलण्याची आवश्यकता आहे याबद्दल त्या अगदी स्पष्टोच्चारीत आहेत. निधी देण्याच्या पद्धतींमध्ये त्यांना विकास निधीचे 'प्राप्तकर्ते' म्हणून न पाहता लैगिंक न्यायासाठी बदल घडवणारे प्रतिनिधी म्हणून पाहणे आवश्यक आहे."
**-अपर्णा उप्पलूरी**
कार्यक्रमअधिकारी (प्रोग्राम ऑफिसर), फोर्ड फाउंडेशन

"हा डेटा अचूक आहे आणि मी हे माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. लॉकडाउन दरम्यान मी मुलींना मूलभूत गरजा पुरवण्यास मदत केली व मी पाहिले की शहरी भागातही कसा परिणाम झाला आहे - विकसित आणि विकसनशील शहरांचा एक भाग असूनही मुलींना अजूनही समस्यांना सामोरे जावं लागतंय ... माझे लक्ष वेधून घेणारी गोष्ट [निष्कर्षांमधील] ती म्हणजे संपूर्ण परिस्थिती तील तक्रारी कशा हाताळल्या गेल्या किंवा मुख्यत: स्त्रियांद्वारे सोडवल्या गेल्या."
**-सीमा दोसाद**
20, एमपॉवर गर्ल्स ऍडव्हायझरी कौन्सिल सदस्य

"50% मुलांच्या तुलनेत फक्त १२% मुलींना बाहेर जाण्याची, खेळण्याची किंवा मित्रमैत्रीणींना भेटण्याची परवानगी होती - हे अंतर खूपच मोठं आहे आणि मला असे वाटते की ते मोठ्या प्रमाणावर या अभ्यासाच्या मानसिक आरोग्याशी संबंधित आहे."
**-अभिमन्यु डे**
एमपॉवर लीडर लॅब, जस्ट फॉर किक्स, पुणे मधील संस्थात्मक प्रतिनिधी

# लीडर लॅबचे प्रतिबिंब

- मुलींसाठी गतिशीलता हा नेहमीच एक मुद्दा होता, परंतु महामारीच्या (पँडेमिक) दरम्यान सार्वजनिक वाहतुकींच्या मर्यादित उपलब्धते मुळे विशेषत: बस, गाड्या आणि ऑटो-रिक्षांमुळे त्यांचावर अधिक परिणाम झाला. तसेच यामुळे शहरे स्वच्छ व प्रदूषण मुक्त झाली.

- सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी जागा नाहीत. मुलं नेहमीच मवाल्यांसारखी फिरत असतात आणि हिंसाचार व बलात्काराच्या सतत भीती मुळे सार्वजनिक ठिकाणी बाहेर पडणे खूप कठीण जाते. सार्वजनिक ठिकाणी मुलाखती घेतल्या गेल्या तेव्हा नेत्रावती (१९, मुंबई) हिने सांगितले की "मुलांचा एक गट होता ज्याने छेड काढण्यास सुरू केली आणि त्यामुळे आम्हाला खूप असुरक्षित वाटले. आम्हाला मुलाखत थांबवून खासगी ठिकाणी जावे लागले कारण आम्ही ते घराबाहेर करू शकत नव्हतो."

- शिरीन (२२, मुंबई) हिने सांगितले की शहरात हिंसाचाराची भीती आणि धमकी यामुळे लोकं त्यांच्या मुलींची लग्न करून टाकतात. तिच्या एका प्रतिसादकेच्या समुदायात लैंगिक हिंसाचार खूप होता आणि जवळजवळ सर्व मुलींची लग्न अगदी लवकर झाली होती. तिची प्रतिसादक २४ वर्षांची होती आणि अविवाहित होती, परंतु केवळ ती अपंग असल्यामुळे."

- "मी ज्यांचा ज्यांचाशी बोलले होते ते स्वातंत्र्याबद्दल बोलले, परंतु घराबाहेर पडल्यास लोकं नापसंती व्यक्त करीत होते. बऱ्याच मुलींना त्यांच्या स्वत: च्या शहरात फिरण्याचे स्वातंत्र्य हवे होते". रिचा (१९, अहमदाबाद)

# मुलींच्या सल्ल्याचे आणि एसडीजीचे संयोजन

जगाला सल्ला म्हणून ज्याला मुली नेत्यांनी प्राधान्य दिले आहे त्याचे ठळकपणे वर्णन केले आहे;

## एसडीजी 5: लैगिंक समानता आणि एसडीजी १०: घटलेली असमानता

आमचा असा विश्वास आहे की ही दोन उद्दिष्टे मुलींच्या शिफारशींचा मूळ गाभा आहे आणि इतर सर्व एसडीजी साध्य करण्यासाठी मध्यवर्ती आहेत.

**समुदायांसह**

- लैंगिक समानतेबद्दल दृष्टीकोन विकसित करा जो मुली त्यांचे निर्णय आणि निवडी यांना महत्त्व देईल.
- स्त्रिया व मुलींशी भेदभाव करणाऱ्या पारंपारिक व पुराणमतवादी निकष आणि पद्धती बदला.

**मुलींसोबत**

- मूळ जीवन कौशल्यांवर मुली आणि तरुण महिलांची क्षमता वाढवा.
- मुली आणि तरूण स्त्रियांना त्यांचे हक्क व स्वातंत्र्य जाणून घेण्यासाठी आणि त्यांचा उपयोग करण्यास सक्षम करा.

## एस.डी.जी 3
## चांगले आरोग्य आणि कल्याण

**मानसिक आरोग्य**

- औदासिन्य आणि तणावाला सामोरे जाणाऱ्या मुली व तरुण स्त्रियांना समुपदेशन करण्यास गुंतवणूक करा.
- घरामधून **मजबूत समर्थन आणि प्रतिसाद यंत्रणा** तयार करण्यासाठी कुटुंबांबरोबर काम करा.

**मासिक पाळी**

- आर्थिक दृष्ट्या सॅनिटरी पॅड अधिक प्रमाणात उपलब्ध आणि परवडणारे करा.
- मासिक पाळीच्या बाबतीतली लाज व कलंक कमी करा.

**आरोग्य सुविधा आणि उपलब्धता**

- उच्च गुणवत्तेच्या आरोग्य सुविधांची उपलब्धता सुधारित करा व तिमाही शरीर तपासणी आणि औषधांचा पुरवठा करा.

## एस.डी.जी 4
## उच्च गुणवत्तेचं शिक्षण

**आर्थिक सहाय्य**

- इयत्ता ८वी च्या पलीकडे असलेल्या मुलींसाठी विनामूल्य, दर्जेदार शिक्षण द्या.
- उच्च शिक्षणाला पाठिंबा द्या, शाळेचं पुन्हा एकत्रीकरण करण्यासाठी व ती चालू ठेवण्यासाठी शिष्यवृत्ती प्रदान करा. माध्यमिक शाळेत असलेल्या सर्व मुलींसाठीमध्यान्ह भोजनाची (मिड-डे-मिल) व्यवस्था करा.
- पुस्तके, अभ्यासासाठी मोकळी जागा, वाहतूक आणि समुदाय स्तरीय ग्रंथालयांमध्ये गुंतवणूक करा.
- ज्या मुलींना उपजीविका देखील करावी लागत आहे त्यांच्यासाठी शैक्षणिक संधी वाढवा.

**सुरक्षित शाळा**

- सुरक्षित जागा तयार करा आणि शाळांमधील **लैंगिक व जाती आधारित** भेदभाव कमी करा.
- मुलींच्या शाळांसह शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करा.
- विनामूल्य आत्म संरक्षण प्रशिक्षण सादर करा.

**डिजिटल शिक्षणाची उपलब्धता**

- शिक्षणासाठी डिजिटल उपलब्धता आधुनिक करा.
- **महामारी च्या नंतर देखील** मिश्रित शिक्षण पर्यायांमध्ये गुंतवणूक करा.

**मार्गदर्शन (मेंटोरशिप)**

- मुलींच्या आणि तरुण स्त्रियांच्या मार्गदर्शनासाठी कार्यक्रम तयार करा

## एस.डी.जी 8
## योग्य काम आणि आर्थिक वाढ

**प्रशिक्षण**

- तांत्रिक, कौशल्य निर्माण व रोजगार प्रशिक्षणात गुंतवणूक करा आणि अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वत:ची कार्यक्षमता आणि नेतृत्व प्रशिक्षण समाविष्ट करा.
- जिथे मुली राहतात त्या समुदायांच्या जवळपास प्रशिक्षण केंद्रेतयार करा.
- मुलींना घरातून छोट्या प्रमाणावर असलेला व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षित करा.

**नोकरी निर्मिती**

- रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करणारी धोरणे आणि कार्यक्रम विकसित करा.
- मार्केटशी प्रशिक्षण जोडण्याऱ्या नोकरीच्या संधी निर्माणकरण्यात गुंतवणूककरा.
- अपंग आणि जे कमी साक्षर आहेत त्यांच्यासाठी नोकरीच्या संधींचा विचार करा.

**काम करण्याचा अधिकार**

- महिलांसाठी भेदभाव नसणारी कार्यस्थळे तयार करा.
- महिलांच्या (मोबदला व बिन पगारी) कामाचे मूल्य मान्य करा आणि समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करा.

## एस.डी जी 11
## शाश्वत शहरे आणि समुदाय

**पायाभूत सुविधा**

- पायाभूत सुविधा सुधारित करा, यासह: गृहनिर्माण, स्वच्छ शौचालये, सुरक्षित आणि परवडणारी वाहतूक, पथदिवे, पाणीपुरवठा आणि वीज.

**स्वच्छता**

- स्वच्छता आणि स्वच्छतेमध्ये गुंतवणूक करा जेणेकरुन मुली आणि स्त्रिया निरोगी आयुष्य जगू शकतील.
- हिरवी, स्वच्छ व प्रदूषण मुक्त शहरे तयार करा.

**सार्वजनिक सुरक्षा आणि गतिशीलता**

- शहरातील मुली आणि स्त्रियांसाठी सुरक्षितव हिंसा मुक्त जागा तयार करा.
- लैंगिक हिंसाचार (जीबीव्ही) रोखण्यासाठी कायदे व धोरणे तयार करा आणि त्यांचीअंमलबजावणी होते याची खात्री करा.
- पोलिसांना गुंतवून, गस्त वाढवून आणि दोषींवर कारवाई करून महिला व मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि हिंसाचार रोखण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी यात सुधार आणा.
- मुलींची सुरक्षा आणि गतिशीलता वाढविण्यासाठी समुदाय हस्तक्षेपात गुंतवणूक करा, हिंसा किंवा लैंगिक अत्याचाराच्या भीती शिवाय त्यांना संधी आणि संसाधनांचा उपयोग करून घेण्यास सक्षम करा.
- दोषारोप समाप्त करण्यासाठी आणि लैंगिक हिंसाचार (जीबीव्ही) दैनंदिन जीवनाचा भाग बनणार नाही याची खात्री करण्यासाठी समुदायातील सदस्यांसह, मुलांबरोबर आणि मुलींसह व्यस्त रहा.

**खेळण्याचा अधिकार**

- मुली आणि युवतींना खेळांमध्ये सहभाग घेण्यास प्रोत्साहन द्या. क्रीडांगणे आणि उद्याने तयार करण्यासाठी संसाधनांचे वाटप करा.

# भागधारकांची आखणी (मॅपिंग)

एमपॉवर संघासह, मुली नेत्यांनी विविध भागधारकांविरूद्ध त्यांच्या प्राथमिकतेच्या शिफारशींचा नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी एक अभ्यास केला जे या शिफारशी प्रत्यक्षात आणण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. भागधारकांद्वारे या शिफारशी कशा कार्यान्वित केल्या जाऊ शकतात याबद्दलच्या प्रत्येक सल्ल्यासाठी त्यांनी विशिष्ट प्रश्न तयार केले.

## एस डी जी 4
## उच्च दर्जेचे शिक्षण

वंशिता, १७ अहमदाबाद
शाहजहां, १८ मुंबई
गीता, २१ पुणे
पूजा, १९ मुंबई

### नागरी समाज

- मुलींसाठी तंत्रज्ञान उपलब्धता मर्यादित करणाऱ्या या द्वारपालांसह कार्य करा
- कार्यक्रम सहभागींना इंटर्नशिपसाठी कॉर्पोरेटशी जोडा
- डिजिटल केंद्र स्थान (हब) येथे मिश्रित शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करा
- अधिक मुली ऑनलाइन येऊ लागल्यामुळे सायबर गुंडगिरी वर आळा घाला
- मुलींसाठी शिकवणी वर्गावर लक्ष केंद्रित करा जेणेकरून त्या शाळेत चांगली कामगिरी करतील
- पालकांनी आपल्या मुलींची शाळा बंद करू नये यासाठी पालकांसह कार्य करा

### सरकार

- महामारीच्या नंतर माध्यमिक शाळेतील मुलींसाठी एकत्रित शिक्षण पर्यायांचा विचार करा जेणेकरून त्यांनी निवडलं तर ते ऑनलाइन अभ्यास करणे सुरू ठेवू शकतील
- डेटा पॅकसाठी अनुदान तयार करा
- समाजातील डिजिटल केंद्रस्थानांसाठी (हब) अंदाजपत्रकाचे(बजेट) वाटप करा.
- इयत्ता १२ वी पर्यंतच्या मुलींसाठी माध्यमिक शाळा विनामूल्य करा
- शालेय अभ्यासक्रमात एक घटक म्हणून लैंगिक समानतेचा विषय समाविष्ट करा
- लैंगिक प्रवृत्ती सुधारण्यासाठी पाठ्यपुस्तकांची तपासणी करून घ्या
- चांगल्या पायाभूत सुविधांद्वारे मुलींचा शाळेचाप्रवास सुरक्षित करा.

**डिजिटल शिक्षणाची उपलब्धता आधुनिक करा.**
**महामारीच्या पलीकडे मिश्रित शिक्षण पर्यायांमध्ये गुंतवणूक करा.**

### उपाय

- समुदायातील केंद्रस्थान (डिजिटल हब) विशेषत: लहान शहरांमध्ये संभारित केंद्र (चार्जिंग स्टेशन) आणि वायफाय उपलब्ध करून द्या.
- शाळांमध्ये आणि डिजिटल केंद्रस्थानांमध्ये (हब) मिश्रित शिक्षण सुरु करा
- समाजात विनामूल्य वायफाय उपलब्ध करून द्या
- सहकार्याद्वारे डिजिटल साक्षरता आणि इंटर्नशिप सुरु करा

- इयत्ता १२वी पर्यंतच्या मुलींसाठी सर्व माध्यमिक शिक्षण विनामूल्य करा.
- पुस्तकांची तपासणी करून व पालकांसह कार्य करून लैंगिक पक्षपातीपणा प्रतिबंधित करा
- मुलींना शाळेत जाण्यासाठी छोटा व सुरक्षित प्रवास उपलब्ध करून द्या

**इयत्ता ८वी च्या पलीकडे असलेल्या मुलींसाठी विनामूल्य दर्जेदार शिक्षण द्या.**

**मुलींच्या शाळांसह शैक्षणिक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करा.**

### शहर नियोजक

- समुदायात डिजिटल केंद्र स्थानासाठी (हबसाठी) विशेषत: कमी इंटरनेट उपलब्धता असलेल्या शहरांमध्ये जागेची योजना समाजात विनामूल्य वायफायसाठी पायाभूत सुविधा तयार करा
- मुलींचा प्रवास मर्यादित होईल या साठी शहरातील योजनेत शाळा समुदायांच्या जवळ असल्याचे सुनिश्चित करा

### देणगीदार

समुदायातील डिजिटल केंद्रस्थान (हब) स्वीकारा आणि या केंद्रांमधील नागरी समाज कार्यक्रमांना निधी द्या

### कॉर्पोरेटस्

- नागरी संस्था संघटनांच्या सहकार्याने डिजिटल इंटर्नशिप कार्यक्रम तयार करा
- जुने टॅबलेट आणि लॅपटॉप ई-सायकल करा आणि नागरी संस्थांमार्फत मुलींना वितरित करा
- संगणकीय कौशल्ये कर्मचारी स्वयंसेवकांद्वारे शिकविण्यासाठी नागरी संस्थांशी सहयोग करा

# एस डी जी 3
# चांगले आरोग्य आणि कल्याण

रिचा, १९ अहमदाबाद
अवध, २१ दिल्ली
रोशनी, १६ लखनऊ
आलिया, १८ पुणे
शुभांगी, १८ पुणे

## सरकार

- देशभरातील शहरी आरोग्य सेवांच्या पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करा.
- महिला आरोग्य हेल्पलाइन क्रमांक तयार करा
- त्रैमासिक तपासणीची तरतुद करा: रुग्णालयात मुलींसाठी विशेष दिवस आणि वेळ नियुक्त करा, जेथे काही चाचण्या विनामुल्य असतात
- सर्व मुलींसाठी आरोग्य तक्ता तयार करा जे तिमाही तपासणी दरम्यान अद्यायावत (अपडेट) होईल.
- मासिक पाळी येणाऱ्या मुलींसाठी (सॅनिटरी) पॅड व औषधांची रुग्णालयात आणि समुदायात तरतुद / व्यवस्था करा
- सरकारी शालेय अभ्यासक्रमात मानसिक आरोग्य सत्रांचा समावेश करा खालील यासह:
  - आत्महत्या प्रतिबंध आणि तणाव
  - परीक्षेच्या वेळीचे व्यवस्थापन
  - आपण शाळेत एखाद्या वर्गात नापास झाल्यास काय करावे
- मानसिक आरोग्य तज्ञ मोहल्ला क्लिनिकमध्ये (दवाखान्यात) (दिल्ली) आणि इतर शहरांमधल्या विनामूल्य आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध असावेत.
- अधिकृत संप्रेषणांमध्ये मानसिक आरोग्याविषयी निर्णय-मुक्त संदेशास सक्रियपणे सुरु करा

## शहर नियोजक:

- शहरातील दवाखान्यांसाठी जागा नेमणूक करा;
- जी मुलींसाठी मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देतील, विशेषत: संसाधनांच्या अभावामुळे मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामासाठी
- सेनेटरी नॅपकिन्स आणि साबणाच्या तरतुदीसह कुठले ही आपत्तीजनक विचार व प्रश्न मध्ये न आणता लैंगिक आणि पुनरुत्पादक ज्ञान उपलब्ध करून देणे
- तिमाही शारीरिक तपासणीची व्यवस्था असणे

## नागरी समाज

- आपल्या संस्थेत मुली व स्त्रियांसाठी व शाळेत आणि महाविद्यालयांमध्ये सुद्धा एक विशेष भागासह मानसिक आरोग्य आणि लैंगिक शिक्षण कार्यक्रम तयार करा
- हुंडा देण्याच्या प्रथेमुळे परिणाम झालेल्या कुटुंबांसाठी समुपदेशनची तरतुद करा, ज्यांना बहुतेकदा वधू, वर आणि त्यांच्या कुटुंबियांशी बोलण्यासाठी तृतीय पक्षाची आवश्यकता असते

**उच्च-गुणवत्तेच्या आरोग्य सुविधांची उपलब्धता सुधारित करा आणि तिमाही तपासणी व औषधे यांची तरतुद करा.**

## उपाय

- शहरी समुदाय आरोग्य सेवा केंद्रांमध्ये (यू-सीएचसी) गुंतवणूक करा जेणेकरून ते मुलींना विस्तृत सेवा देऊ शकतील.
- महिला आरोग्य हेल्पलाइन तयार करा
- कोणत्याही बदलांचा मागोवा घेण्यासाठी तक्तासह मुली आणि तरुण महिलांसाठी तिमाही तपासणीची तरतुद / व्यवस्था करा

नैराश्य व तणावाचा सामना करण्यासाठी मुली आणि तरुण स्त्रियांसाठी मानसिक आरोग्य समुपदेशनात गुंतवणूक करा.

- मानसिक आरोग्य सेवा देण्यासाठी शहरी समुदाय आरोग्य सेवा केंद्रांमध्ये गुंतवणूक करा
- अभ्यासक्रम, सार्वजनिक जागांमध्ये आणि सोशल मीडियावर याबद्दल बोलून मानसिक आरोग्याच्या विषयाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवा
- एकात्मिक मानसिक आरोग्य आणि लैंगिक / पुनरुत्पादक आरोग्य अभ्यासक्रम तयार करा

## देणगीदार

- आपल्या संस्थेच्या रणनीतीमध्ये मानसिक आरोग्य आणि लवचीकपणाचा समावेश करा.
- मुलींच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपक्रमांना निधींची तरतुद करा
- आत्महत्या प्रतिबंधक व मादक पदार्थ आणि दारू दुरुपयोग प्रतिबंधक कार्यक्रमांना निधीची तरतुद करा

## कॉर्पोरेटस्:

- कर्मचाऱ्यांना विनाशुल्क (सॅनिटरी) पॅडची तरतुद करा
- महिला कर्मचारी स्वतः समुदायात मासिक पाळीबद्दल बोलण्यासाठी पुढाकार घेऊ शकतात
- मासिक पाळीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन जाहिरात मोहिमेद्वारे बदला.

## शहर नियोजक:

- मासिक पाळीविषयी सकारात्मक संदेशांसह शौचालयाच्या भिंती रंगवा.
- सार्वजनिक शौचालय, शाळा, रुग्णालये आणि समुदायात सॅनिटरी पॅड वितरक (डिस्पेंसर) स्थापित करा

## नागरी समाज:

- आपल्या संस्थेत मुली व स्त्रियांसाठी व शाळेत आणि महाविद्यालयांमध्ये सुद्धा एक विशेष भागासह मानसिक आरोग्य आणि लैंगिक शिक्षण कार्यक्रम तयार करा
- हुंडा देण्याच्या प्रथेमुळे परिणाम झालेल्या कुटुंबांसाठी समुपदेशनची तरतुद करा, ज्यांना बहुतेकदा वधू, वर आणि त्यांच्या कुटुंबियांशी बोलण्यासाठी तृतीय पक्षाची आवश्यकता असते
- काळ्या प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये (सॅनिटरी) पॅड बांधण्यावर निर्बंध घालण्यासाठी दुकानदारांसह काम करा
- मासिक पाळीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यास कुटुंबांसह कार्य करा
- नको असलेली गर्भधारणा कमी करण्यासाठी मासिक पाळी व सुरक्षित संभोगाबद्दल (सेक्सबद्दल) मुलांशी संवाद साधा.
- बदलत्या शरीराबद्दल आणि मासिक पाळीबद्दल बोलण्यासाठी खेळांचा वापर करा

## उपाय

**सॅनिटरी पॅड अधिक व्यापकपणे उपलब्ध व परवडणारे बनवा.**

**मासिक पाळीच्या भोवतीची लाज व कलंक कमी करा.**

- खेळाद्वारे एकात्मिक मानसिक आरोग्य व लैंगिक / पुनरुत्पादक आरोग्य अभ्यासक्रम तयार करा
- मासिक पाळीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्यासाठी शौचालयांच्या भिंतींवर चित्र रेखाटा.
- (सॅनिटरी) पॅड उपलब्ध करुन देण्यासाठी डिस्पेंसर स्थापित करा

## देणगीदार

- आपल्या संस्थेच्या रणनीतीमध्ये मानसिक आरोग्य आणि लवचीकपणाचा समावेश करा.
- मुलींच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपक्रमांना निधींची तरतुद/ व्यवस्था करा
- आत्महत्या प्रतिबंधक व मादक पदार्थ आणि दारू दुरुपयोग प्रतिबंधक कार्यक्रमांना निधींची तरतुद/व्यवस्था करा
- मानसिक आणि लैंगिक / पुनरुत्पादक आरोग्य आणि अधिकाराकडे लक्ष देण्यासाठी क्रीडा आधारित कार्यक्रमांना वित्तपुरवठा करण्याचा विचार करा

## कॉरपोरेट्स

- मानसिक आरोग्याकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन सोशल मीडिया मोहिम व जाहिराती द्वारे बदला.
- दरमहा मानसिक आरोग्याचा दिवस / आठवडा आयोजित करा.
- कर्मचाऱ्यांना विनाशुल्क (सॅनिटरी) पॅडची तरतुद/व्यवस्था करा
- महिला कर्मचारी स्वतः समुदायात मासिक पाळीबद्दल बोलण्यासाठी पुढाकार घेऊ शकतात
- मासिक पाळीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन जाहिरात मोहिमेद्वारे बदला.

# एस.डी.जी 8
# योग्य कार्य आणि आर्थिक वाढ

प्रीति, 24 दिल्ली
मोनिका, 19 दिल्ली
ज्योति, 24 अलवर
रानी, 20 दिल्ली
सोनी, 20 मुंबई

## नागरी समाज

- केवळ मुलींना नोकरी मिळेपर्यंतच नव्हे तर त्यानंतरही सहभागींसाठी भक्कम माजी विद्यार्थी नेटवर्क तयार करा
- मार्केटमध्ये आवश्यक असलेल्या कौशल्यांवर आधारित आपल्या अभ्यासक्रमाची योजना आखण्यासाठी कॉर्पोरेट्ससह कार्य करा आणि कार्य कौशल्य/आवश्यक कौशल्ये देण्यासाठी स्वयंसेवकांना गुंतवून घ्या
- मुलींना एका पेक्षा अधिक उपजीविकेच्या पर्यायांशी ओळख करून द्या (जे मुली नेहेमीच करतात, तेवढेच नव्हे)

## सरकार

मुलींसाठी रोजगाराच्या कौशल्यांवर लक्ष केंद्रित करणारी एक योजना विकसित करा व त्यात भाषण कला आणि मुलाखत तंत्र यासारख्या आवश्यक कौशल्यांचा समावेश असेल

**तांत्रिक, कौशल्य-निर्माण व रोजगार प्रशिक्षणात गुंतवणूक करा आणि अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून स्वत: ची कार्यक्षमता व नेतृत्व प्रशिक्षण समाविष्ट करा.**

**रोजगार निर्मितीवर लक्ष केंद्रित करणारी धोरणे आणि कार्यक्रम विकसित करा.**

**महिलांच्या (मोबदला आणि पगार न मिळालेल्या) कामाचे मूल्य मान्य करा आणि समान कामासाठी समान वेतन सुनिश्चित करा.**

## उपाय

अधिक चांगल्या उपलब्धतेसाठी एकत्रितपणे कार्य करा, जे कार्य व स्त्रियांकरिता कौशल्य-प्राप्ती भोवतीचे चित्र बदलू शकेल (खालील कारणांमुळे):
- मुलींवर लक्ष केंद्रित करणाऱ्या योजना तयार करणे व एका पेक्षा अधिक उपजीविकेच्या पर्यायांशी ओळख करून देणे
- समान वेतनासाठी समान काम हे आपल्या धोरणांमध्ये रुतवणे
- कौशल्य-प्राप्ती आणि रोजगारासाठी भागधारकांशी सहकार्य करणे
- समुदायातील मुलींसाठी कौशल्य-प्राप्ती केंद्र (स्किलिंग सेंटर) तयार करणे

## शहर नियोजक

- समान कामासाठी समान वेतनाचे महत्त्व वाढविण्याकरिता शहराच्या भिंती रंगविण्यासाठी कलाकारांना निधी द्या
- समुदायात अश्या जागा तयार करा ज्या कौशल्य प्राप्ती केंद्र म्हणून चालतील कारण अंतर हे सर्वात मोठे कारण आहे ज्यामुळे मुली (केंद्र) सोडून जातात (विवाहित स्त्रियांची परिस्थिती या बाबतीत खूपच वाईट आहे)
- आणि ही केंद्रे चालविण्यासाठी नागरी समाजासह कार्य करा

## देणगीदार

- उपजीविकेच्या रचनेतला एक भाग म्हणून आवश्यक कौशल्यांवर असलेल्या कार्यक्रमांना निधीची तरतुद करा

## कॉरपोरेट्स

- नागरी समाज आणि सरकारी कौशल्य केंद्रांशी मजबूत युती तयार करा. मार्केटमध्ये काय हवे आहे यावर आधारित अभ्यासक्रम सहकार्याने तयार करा
- नागरी समाजासह स्वयंसेवी कार्यक्रम तयार करा जेथे कर्मचारी मुलींना आवश्यक कौशल्यांवर प्रशिक्षण देतील
- पगार अधिक पारदर्शक बनवा, आपल्या संस्थेत महिला आणि पुरुषांना
- समान वेतन जाहीर करण्यासाठी औपचारिक यंत्रणा तयार करा
- आपल्या कंपनीतील नोकरींसाठी स्वयंसेवी संस्था आणि सरकारी कौशल्य कार्यक्रमांसह रिक्त जागा जाहीर करा
- कंपनीची धोरणे लैंगिक-संवेदनशील असावी. उदाहरणार्थ: मुली सुरक्षितपणे घरी परत जाऊ शकतील हे सुनिश्चित करणे.

## नागरिक समाज

अपंग लोकांसाठी संवेदनशील कौशल्य प्राप्ती अभ्यासक्रम तयार करा

**अपंग आणि जे कमी साक्षर आहेत त्यांच्यासाठी नोकरीच्या संधींचा विचार करा.**

## उपाय

कौशल्य प्राप्ती जे सर्वात दुर्लक्षित आहेत त्यांच्यासाठी प्रवेशयोग्य बनविणे:

- कौशल्य केंद्रांमध्ये लेखी परीक्षेच्या जागेवर प्रात्यक्षिक परीक्षा घेणे
- प्रशिक्षणात प्रवेश करण्यासाठी लागणाऱ्या शैक्षणिक आवश्यकता काढून टाकणे
- महामारी नंतर कौशल्य प्राप्ती कार्यक्रम घरातून करता येतील या योजनेचा विचार करणे
- शहरी प्रकल्पांवर जे सर्वात दुर्लक्षित आहेत त्यांची मतं व योगदान घेण्यासाठी त्यांना नियुक्त करणे

## सरकार

- अपंग असलेल्यांसाठी आणि त्यांच्या गतिशीलतेवर बरेच निर्बंध लादलेल्या अश्या मुलींसाठी कौशल्य प्राप्ती कार्यक्रम ऑनलाइन करता येतील याचा विचार करा

प्रमाणपत्रांसाठी लेखी परीक्षांऐवजी प्रात्यक्षिक परीक्षांचा विचार करा “प्रत्येकजण संगणक साक्षर नसला तरीही तो कसा वापरायचा हे सर्वांना माहित आहे, परंतु अंतिम परीक्षा लेखी असल्यामुळे बरेचजण नापास होतात.”- ज्योती २४, अल्वार

- एखादी व्यक्ती वर्ग ८वी पुढे शिकलेला नाही याची पर्वा न करता सर्वांना कौशल्य ज्ञान दिले पाहिजे.

## शहर नियोजक

- शहरांना अधिक समावेशक बनविण्यासाठी अपंग असलेल्या मुलींना नियुक्त करा जी आपली मतं व योगदान शहरी प्रकल्पांवर, विशेषत: वाहतुक यावर देऊ शकतील

## देणगीदार / कॉर्पोरेटस्

- आपल्या संस्थेमध्ये अपंग लोकांना नियुक्त करा
- अश्या कार्यक्रमांना निधीची तरतूद करा विशेषत: जे अपंग किंवा कमी साक्षर आहेत त्यांच्यासाठी रोजगार कौशल्ये निर्माण करतात

# एस.डी.जी ११
# शाश्वत शहरे आणि समुदाय

प्रिया, २३, लखनऊ
ललिता, दिल्ली, १६
खुर्शीदा, लखनऊ, २०
शिरीन, मुंबई, २२

## नागरी समाज

- काठावर असलेल्या लोकांच्या आवाजाचा शहराच्या योजनांमध्ये समावेश होतोय हे सुनिश्चित करण्यासाठी नवीन योजना आणि प्रकल्पांवर शहरी नियोजकांसोबत कार्य करा
- लैंगिक-संवेदनशीलता प्रशिक्षण व वार्षिक प्रमाणपत्रावर कायद्याच्या अंमलबजावणीसह कार्य करा
- शहरी नियोजकांनी विकसित केलेल्या हिंसा-मुक्त विभागांमध्ये कार्यक्रम चालवा
- त्यांच्यावर झालेल्या लैंगिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये जेव्हा त्यांनाच जबाबदार ठरविले जाते अश्या वेळेस काय प्रतिसाद द्यायचा यासाठी मुलींना प्रशिक्षित करा
- लैंगिक हिंसाचाराच्या मुद्द्यावर प्रौढ आणि मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी (जीबीव्हीवर) समुदाय-स्तरीय अभ्यासक्रम तयार करा

## सरकार

- नगरपालिका महामंडळांनी शौचालय बांधले पाहिजे आणि त्यांच्या देखभालीची जबाबदारी स्वीकारली पाहिजे
- कमी स्त्रोत असलेल्या लोकांना शौचालय वापरण्यासाठी पैसे द्यावे लागू नयेत
- शौचालयात पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करा
- अनिवार्य वार्षिक प्रमाणपत्रासह सर्व कायदा अंमलबजावणी विभागांसाठी लैंगिक-संवेदनशीलता प्रशिक्षणात गुंतवणूक करा
- हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी नागरी समाजाबरोबर मिळून कार्य करा

पायाभूत सुविधा सुधारित करा, यासह: गृहनिर्माण, स्वच्छ शौचालये, सुरक्षित वपरवडणारी वाहतूक सेवा, पथदिवे, पाणीपुरवठा आणि वीज

## उपाय:

- निर्णय घेण्याच्या व शहरची योजना आखण्याच्या क्रियेत मुलींना सामील करा आणि मोहिमेद्वारे त्यांची दृश्यमानता सक्षम करा
- समुदायाच्या जवळपास स्वच्छ, सुरक्षित आणि विनामूल्य शौचालयांची तरतूद करा

पोलिसांना गुंतवून, गस्त वाढवून आणि दोषींवर कारवाई करून महिला व मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि हिंसाचार रोखण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी अधिक चांगली करा.

मुलींची सुरक्षा आणि गतिशीलता वाढविण्यासाठी समुदाय हस्तक्षेपांमध्ये गुंतवणूक करा, हिंसा किंवा लैंगिक अत्याचाराच्या भीतीशिवाय त्यांना संधी आणि संसाधनांचा वापर करण्यास सक्षम करा.

समुदायातील सदस्यांसह, मुला-मुलींसह पीडित-दोषारोप समाप्त करण्यासाठी आणिलैंगिक हिंसाचाराला (जीबीव्ही) दैनंदिन जीवनाचा भाग बनविला जात नाही याची खात्री करा.

शहराच्या योजना बनवताना एका पेक्षा अधिक विभाजनांचा विचार करा जसे
- शहरात हिंसाचारमुक्त मोकळ्या जागा निश्चित करा जिथे मुली एकत्रितपणे जमू शकतील आणि जेव्हा त्यांना हिंसाचाराचा धोका वाटेल तेव्हा त्या तिथे जाऊ शकतील.
- सर्व कायदा अंमलबजावणीसाठी वार्षिक प्रमाणपत्रासह लैंगिक-संवेदनशीलता प्रशिक्षण
- लैंगिक हिंसाचाराच्या (जीबीव्हीच्या) मुद्यावर मुलं व समुदायांसह संवाद साधने व अभ्यासक्रम (आणि निधींची) तरतुद करणे

## शहर नियोजक

- त्रुटी कुठे आहेत हे समजून घेण्यासाठी समुदायांमध्ये पायाभूत दुरुस्ती करताना मुलींचे सल्ले घ्यावे.
- मुली जिथे राहतात त्यांच्या जवळपास, समुदायात पुरेश्या प्रमाणात विनामूल्य शौचालयांची योजना समाविष्ट करा.
- सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करण्यासाठी मुलींना येणाऱ्या निर्बंधांची आखणी आयोजित करा जी नवीन प्रकल्पांना माहिती देण्यासाठी कामी येईल
- शहर / सार्वजनिक ठिकाणांवर त्यांच्या हक्काचा दावा करण्याकरिता मोहिमेद्वारे जाणीवपूर्वक मुली आणि स्त्रियांना सार्वजनिक ठिकाणी दृश्यमान करा: पथनाट्य वापरा, समुदायातील व खेळातील मुलींचे भाषण वापरा
- खेळाच्या मैदानावर केवळ मुलींसाठी असेल अशी खेळण्याची जागा आरक्षित करा
- समुदायाच्या गरजा चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी नागरी समाजातील लोकांशी संवाद साधा
- सर्व नवीन शहर योजना आणि प्रकल्पांसाठी लिंग-आधारित चाचणी (ऑडिट) अनिवार्य करा. या सभांमध्ये किशोरवयीन मुलींचा समावेश करा आणि त्यांच्या कल्पनांवर कृती करा
- शहरभर हिंसा-मुक्त मोकळ्या जागा तयार करा, जिथे मुली भेटू शकतात, वेळ घालवू शकतात, सहयोग करू शकतात आणि एकत्र गृहपाठ करू शकतात. मुली जेव्हा हिंसाचाराच्या धोक्याचा सामना करतात तेव्हा देखील त्या येथे येऊ शकतात.

## देणगीदार आणि कॉर्पोरेटस्

- लैंगिक हिंसाचाराचा सामना करण्यासाठी मुलं आणि समुदायातील सदस्यांसह हस्तक्षेप करणाऱ्या कार्यांना निधीची तरतूद करा जेणेकरून मुलं परिवर्तनाचे समर्थक बनतील
- समुदायातील हिंसा-मुक्त मोकळ्या जागांना दत्तक घ्या आणि त्यांना निधींची तरतूद करा

# येथून आपण कोठे जाणार?

मुलींना यात प्रमुख केंद्र मानणे आपण जे काही करता त्यामध्ये मुलींना अर्थपूर्णपणे सामील करा कारण जर आपण मुलींचे शहाणपण ऐकले तरच यशाची शक्यता वाढेल | **उपाय**: गोलमेज वर मुलींना प्रतिनिधित्व मिळेल याची खात्री करा

## नागरी समाज

कार्यक्रम रचनेत व अंमलबजावणीमध्ये मुलींना सामील करा आणि त्यांना समुदायात हस्तक्षेपांचे नेतृत्व करू द्या

## शहर नियोजक

सर्व नवीन शहर योजना आणि प्रकल्पांसाठी लिंग-आधारितचाचणी (ऑडिट) अनिवार्य करा. या सभांमध्ये किशोरवयीन मुलींचा समावेश करा आणि त्यांच्या कल्पनांवर कृती करा

## देणगीदार

आपल्या स्वत:च्या संस्थांचे निर्णय घेताना मुलींना सामील करा, विशेषत: मुलींचा समावेश असलेल्या कार्यक्रमांसाठी

## कॉर्पोरेटस्:

- आपल्या स्वत:च्या संस्थेत लैंगिकतेचा विचार करा
- सध्याच्या स्थितीतील समस्या समजून घेण्यासाठी आपल्या सीएसआर (CSR) धोरणे तयार करण्यात मुलींना सामील करा.

मुलींवर परिणाम होणाऱ्या मुद्द्यांवरील बैठका घेण्याचा विचार करा; जसे मुलींना वाचावा, मुलींना शिकवा {बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ) किंवा आयटीआयमध्ये कौशल्य प्राप्ती; स्थानिक व जिल्हा पातळीवर (आणि त्याही पलीकडे)}.

या अहवालातून मला मिळालेली सर्वात मोठी शिकवण ही आहे की जरी आपण सर्व वेगवेगळ्या शहरांमध्ये राहात असलो आणि आपली परिस्थिती भिन्न असली, तरीही आपल्या समोरील आव्हाने समान आहेत आणि आपल्याला ती एकत्रितपणे सोडवण्याची गरज आहे. मुली बिंधास्तपणे पावले उचलत आहेत आणि पुढचा रस्ता तयार करून हा प्रवास सुलभ करणे हे आपले कर्तव्य आहे. एकत्र काम करण्याची वेळ आली आहे कारण वास्तविक बदल होण्यासाठी जगाला शब्दांपेक्षा जास्त (कृती करण्याची) गरज आहे."

\- **रूबी**

20, एमपॉवर गर्ल्स ॲडव्हायझरी कौन्सिल.

# क्षेत्रातील प्रतिबिंब

"कोविड-१९ मुळे अनेक आव्हाने व अडचणी ज्या मुलींनी व्यक्त केल्या आहेत आणि ज्या सर्वेक्षणात हस्तगत झाल्या आहेत त्यांचा लैगिंक अभ्यास अभ्यासकांनी यापूर्वी अंदाज लावला होता. म्हणूनच, याचे क्षेत्र अभ्यासानुसार प्रतिध्वनीत होणे खूप मौल्यवान आहे. अश्या वेळी मला धैर्य देणारी गोष्ट जी वाटली ती म्हणजे बऱ्याच मुली सकारात्मक राहिल्या आणि भविष्याबद्दल अजूनही आशावादी होत्या. जर मुली आणि त्यांच्या शिफारसी ऐकल्या गेल्या तरच हा विश्वास सफल होऊ शकतो."

-डॉ. रविंदर कौर
समाजशास्त्र आणि सामाजिक मानववंशशास्त्र
भारतीय तंत्रज्ञान संस्था, दिल्ली यांचे प्राध्यापक

"मुलींच्या अनुभवांचा पाठपुरावा करण्यासाठी ही संख्या असणे उपयुक्त आहे आणि ज्याचा मुलींसाठी अधिकाधिक चांगल्या संसाधनांसाठी समर्थन करण्यास उपयोग केला जाऊ शकतो. आपण बहुतेक वेळा मुलीच्या जीवनातील एका बाबीकडे पाहतो जे आपल्याला सर्वात महत्वाचे वाटते त्यानुसार: तिचे शिक्षण, किंवा तिचे शरीर, तिचे आर्थिक कल्याण, इ. परंतु हा डेटा ती काय अनुभवत आहे त्याचे संपूर्ण चित्र दाखवतो आणि तिच्या एका पैलू ऐवजी सर्वत्व तिलाच मध्यभागी ठेवतो. डेटा ज्या पद्धतीने लिहिला जातो त्यामुळे मुलींमधील अनुभवांची विविधता दर्शविण्यास देखील मदत होते आणि हे समजण्यास की ते अखंड नाहीत. सर्व प्रकारच्या घटकांच्या आधारे मुलींवर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव पडला जाईल आणि त्यासाठी जबाबदार असणे महत्वाचे आहे."

– ज्योडी मैरुम
लैगिंकन्याय्य सल्लागार

"एक मुख्य आव्हान ज्याला आपल्या देशातील मुली आणि युवतींना सामोरे जावे लागते आहे ते म्हणजे आवाज असूनही तो ऐकला जात नाही. 'तिच्या आवाजात' ह्या संशोधन अभ्यासाला अधिक निगडित बनवते, कारण ते मुलींसह, त्यांच्या द्वारे आणि त्यांच्यासाठी विकसित केले गेले आहे. या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर भारतातील तरुण मुलींचे शिक्षण, आर्थिक परिस्थिती, आरोग्य आणि सामाजिक कल्याणावर गंभीरपणे परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत आपण कमीतकमी तरुण मुलींची कार्यक्षमता वाढविण्यास समर्थन करू शकतो जेणेकरून या आव्हानांचे निराकरण त्या स्वतः करू शकतील ."

- नगमा मुल्ला
अध्यक्ष आणि सीओओ, एडेलगिव्ह फाउंडेशन

"हा कामाचा एक महत्त्वाचा भाग आहे जो आधीपासूनच अत्यंत दुर्लक्षित असलेल्या लोकांवर महामारीच्या प्रमाणाबाहेरच्या परिणामांबद्दल व्यापकपणे नोंदविलेल्या गोष्टींना सूक्ष्म भेद आणि पोत देईल."

- रोसा ब्रान्स्की
को-फाउंडर आणि को-सीईओ, परपोसफूल



17 PARTNERSHIPS FOR THE GOALS

# एसडीजी 17 द्वारे पुढील मार्ग शोधत आहोत

## भागीदारी

धोरणकर्ते, कार्यक्रम प्रमुख, प्रसार माध्यम आणि इतर व्यक्ती क्वचितच मुलींना प्राधान्य देतात - त्यांनी विकसित केलेली धोरणे व कार्यक्रम, त्यांनी दिलेली संसाधने आणि त्यांनी तयार केलेल्या सामाजिक आख्यानांमध्ये. मुलींचे आवाज त्यांच्या घरात आणि समुदायात ऐकले जात नाहीत, व्यापक मंचांमध्ये तर अजूनच कमी. ही अदृश्यता महामारी (पँडेमिक) होण्या आधी अस्तित्त्वात होती आणि जसे की आमच्या संशोधनात उघडकीस आले आहे - गेल्या वर्षभरात ती (अदृश्यता) आणखी बिकट झाली आहे.

आम्ही जेव्हा कोविड-१९ नंतरच्या पुनर्रचनेबद्दल आणि वंचित समुदायांना आधार देण्याच्या वेगवेगळ्या मार्गांबद्दल विचार करतो, तेव्हा हा क्षण आम्हाला एक अनोखी संधी प्रदान करतो. गोष्टी ज्या पद्धतीने होत्या त्याकडे परत जाण्याचे उद्दीष्ट असू नये कारण कोविड पूर्वी जिला सामान्य परिस्थिती मानली जायची ही भारतातील आणि जागतिक पातळीवर अनेक किशोरवयीन मुलींसाठी हानिकारक होती. आता फक्त मुली काय म्हणत आहेत ते ऐकण्याचीच नव्हे तर त्यांच्या खोल अंतर्दृष्टीचा फायदा घेण्याची वेळ आली आहे. महामारी (पँडेमिक) आणि त्यानंतरच्या लॉकडाउन मुळे बऱ्याच जणांना त्रास झाला आहे, परंतु पुन्हा नव्याने उभारण्याची गरज आपल्याला मुली, कुटूंब आणि समुदायांसाठी चांगल्या वास्तविकता निर्माण करण्याची संधी देते.

हे संशोधन मुली आम्हाला काय सांगतायेत ते ऐकण्याची शक्ती दर्शवते. तथापि, केवळ त्यांच्या शिफारसींच्या आधारे बदल लागू केल्यास त्यांचे जीवन वेगळे होईल. आम्ही त्यांचे ज्ञान आणि अनुभव वाढवले व उंचावले पाहिजे जेणेकरून त्यांची मतं त्यांच्यावर परिणाम करणारे कार्यक्रम तयार करताना घेतली जातील. निधी देणारे, व्यवसायी, धोरणकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणून आपण त्यांच्या शिफारशींवर कार्य केले पाहिजे आणि त्यांचे समर्थन करण्यासाठी संसाधनांचे वाटप केले पाहिजे. जेव्हा आपण मुलींच्या सल्ल्यांकडे लक्ष देतो तेव्हाच आपण याची अपेक्षा करू शकतो की 'पुढे जिला सामान्य परिस्थिती मानली जाईल' ती प्रणालीगत लैंगिक असमानता दूर करू शकते.

दीर्घकालीन शाश्वत प्रभावाच्या मध्यभागी भागीदारी असते, म्हणून आम्ही आपल्याला आमंत्रित करतो:

**१. या माहितीचा वापर करा**

हा अहवाल आणि त्याचे निष्कर्ष सार्वजनिक क्षेत्रात (डोमेन मध्ये) आहेत आणि मुलींच्या शिफारशी प्रत्यक्षात आणून संबंधित भागधारक त्यांच्या कामात मुख्य प्रवाहात येऊ शकतात.

**२. मुलींच्या नेतृत्त्वाखाली घेतलेल्या निर्णयांना समर्थन द्या व निधी प्रधान करा**

एसडीजी इंडिया इंडेक्स २०१९, भारताच्या एसडीजी वचनबद्धतेवर झालेल्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठीचा आधारभूत अहवाल आहे, लैंगिक समानतेसाठी भारताला 'आकांक्षावादी' वर्गात वर्गीकृत करतो. लैंगिक समानतेचा दृष्टिकोन मुख्य प्रवाहात आणण्याचा विचार करताना व इतर एसडीजीएस मध्ये याचा विचार होण्यासाठी धोरणात्मक गुंतवणुकीशिवाय पर्याय नाही. तसेच भारतीय महिला व मुलींच्या परिस्थितीचे चित्रही बदलणार नाही कृती करण्याचे आव्हान म्हणजे जे मुलींना त्यांच्या स्वत:च्या जीवनात नायक म्हणून केंद्रित करतात व सर्व सामाजिक विकासाच्या उद्दीष्टांमधे लैंगिक दृष्टिकोनाचा विचार करतात अश्या कार्यक्रमांना संसाधन पुरवणे.

**३. समविचारी भागीदारांची युती तयार करा**

आपण आपल्या भागाच्या बेरजेपेक्षा जास्त असू शकतो. आमच्या कार्यक्रमांमध्ये आणि क्रियांमध्ये मुलींचे आवाज केंद्रित करून, आम्ही खात्री बाळगू शकतो की त्यांच्या गरजा अधिक योग्यरित्या सोडवल्या जात आहेत. आपण करत असलेल्या कामात एकत्रितपणे मुली नेतृत्वाखालील दृष्टिकोन खोलवर रुतवणे आवश्यक आहे, खासगी क्षेत्रातील वाहिन्यांसह मुलींचे आवाज मुख्य प्रवाहात आणणाऱ्या व संसाधनांचा प्रवाह करणाऱ्या अभ्यासाचा एक सामान्य समुदाय तयार करणे आवश्यक आहे. या अहवालात मुलींनी ठळक केलेल्या क्षेत्रात आपण जास्तीत जास्त धोरणात्मक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. एकत्रितपणे, आपण त्यांच्या कल्पना व उपाय पुढे नेऊ आणि लैंगिक समानता प्राप्त करण्यात खरी प्रगती करू.

